|| श्री ||

मराठी व्यावसायिक नाटक

# दोन स्पेशल

लेखक दिग्दर्शकः क्षितिज पटवर्धन

ड्राफ्ट ६.०

**पात्रः**

**मिलींद भागवतः वय ३४ | उमेश भोसलेः वय २१ | स्वप्ना जोगः वय ३३**

**प्रवेश पहिला**

१९८९ सालच्या पुण्यातल्या एका वृत्तपत्राच्या ऑफीसचा एक भाग. प्रेक्षकांच्या डाव्या हाताला आत यायचा दरवाजा, मागे व्हरांडा. व्हरांडयात जुना बाक. दरवाजाला लागूनच लांब भिंत. त्याला टेकून एक स्टूल. पाण्याचा गळका पिंप. शेजारी टेबल. त्यावर फोन. वर तसबिरी. खाली दोन रॅक मधोमध तीन पायऱ्यांचा जिना. संपादकांच्या केबिनकडे आणि ट्रान्सलेशन वाल्यांकडे जाणारा. जिन्याला लागून समोरच्या बाजूला अवजड जुनं टेबलं. त्याला रोलिंग चेअर. संपादकांच्या दाराला लागूनच उजवीकडे लाकडी लांबलचक पार्टीशन. आत बातमीदारांचा विभाग. वर दुधी काचा. मधे दरवाजा. दरवाजाला लागून बाहेर एक टेबल ज्यावर दोन टेलिप्रिंटर आणि एक फोन ठेवलेला. या टेलीप्रिंटरमधून दर दहा पंधरा मिनिटांनी कागद रोल होऊन पडावे. टेबलाच्या वर असंख्य कागद डकवलेला जुना बोर्ड. व्हरांडयातून एखादया झाडाची फांदी आणि स्ट्रीट लाईटचा प्रकाश डोक वावा. पुढे दोन टयूबलाईटसचा भगभगीत उजेड. काही ठिकाणी कागद पडलेले. कोपऱ्यात जुन्या पेपरांचा गठ्ठा.

**साऊंड डिझाईनः** हे कार्यालय पहिल्या मजल्यावर आहे अशा पध्दतीनं त्याचं साऊंड डिझाईन व्हावं. खालून छापखान्याचा आवाज येतो आहे. बाहेरुन त्यावेळेच्या गाण्यांचा, बातम्यांचा, जाहीरातींचा हलका आवाज येतोय.

पडदा उघडतो तेव्हा दाराजवळच्या स्टुलावर एक मुलगा पाय आणि खांदे आत घेऊन बसला आहे. फुलशर्ट फुलपँट चपला घालून **उमेश भोसले वय २०, २१** हातात एक कापडी पिशवी घटट धरुन कोणाची तरी वाट पहातो आहे. एक दोन क्षण जातात. दार उघडतं आणि **मिलींद भागवत, वय ३४** आउट केलला फुल शर्ट, वर जर्कीन, खाली जुनी जीन्स, बूट आणि खांदयावर एक जुनी साईडबॅग लटकवून आत येतो. मिलींद बॅग ठेऊन रुमालानं चेहरा पुसतो, पिंपातलं पाणी पितो. त्याला काहीतरी आठवतं. तसाच बाजूच्या सेक्शनमध्ये जातो आणि एक टू इन वन आणतो. टेबलावर ठेऊन हलक्या आवाजात लावतो. रात्रीचे साडे नऊ वाजलेत असं लक्षात येतं. तो स्वतःच्या घडयाळाकडे पहातो. वैतागून दोन टिचक्या मारतो. घडयाळ चालू झालंय असं कळतं. ट्रे मधून कागद काढून पहात बसतो. एक कागद फाडतो. दुसरा फाडतो. तिसरा फाडतो. चौथा पहातो. त्याच्याकडे नीट निरखून पहातो. त्याला सुन्न व्हायला होतं. ते तसेच ठेऊन बसतो, त्याकडे पहातो.

मिलींदः (ओरडतं) गिरीधर, चहा आणा... इकडे !! (फोन वाजतो. मिलींद फोन उचलतो.) मिलींद भागवत, दैनिक हिंदुस्थान, रात्रपाळी उपसंपादक... हां बो. बोलं गं. हं. पोचलो. नाही आता कळेल ना, किती आहे ते! पहिलाच दिवस आहे की नाही रात्रपाळीचा? म्हणजे पहिलीच रात्र आहे की नाही रात्रपाळीची. (समोरचे ट्रे उचकत, अचानक त्या मुलाकडे नजर जाते) हं, अण्णा झोपले का? त्यांना म्हणाव स्वस्थ पडून रहा एका कुशीवर. उगाच आपलं याला हाक मार त्याला हाक मार. हॉस्पिटल आहे म्हणावं तळजाईची टेकडी नाही. हं. त्याला तर नीट भेटता पण नाही आलं. धावत होती ना मुलं बागेत. अगं आत्ता. हं. किती म्हणतायत? नऊ हजार? देतो म्हणाव निम्मे सोमवारी, (अचानक) उदया? कुठनं आणायचे एवढे? बघू. काही नाही गं, हे डॉक्टर लोक मुददाम ठेवतात पेशंटना . हॅलो ऐक ना... तो ब्लाऊज खांदयाच्या कोपऱ्यावरनं... हां जरा बघत जा... मग? हं. खातो. तू जेवलीस का? (पॉज. फोन ठेवणार एवढयात मुलगा विचारतो.)

मुलगाः सर, सर जरा तसदी देऊ का?

मिलींदः (फोनवर) ठेवतो मी. (त्याच्याकडे पहात.) काय रे?

(मुलगा सरळ येऊन पाया पडतो. मिलींद दचकतो. त्याला उठवतो. मुलगा चेहऱ्यावरनं धन्य झालाय असं दिसतंय.)

मुलगाः खूप म्हणजे खूप इच्छा होती सर तुम्हाला भेटायची.

मिलिंदः कोणाला भेटायचंय?

मुलगाः ते मिलींद भागवत, उपसंपादक?

मिलींदः पाया पडायच्या आधी तरी विचारायचं.

मुलगाः आयला चुकलं का?

मिलींदः (थांबून) मीच.

मुलगाः मग ठीके! (उत्साहाने) काय की सर मला कोठावळयांनी पाठवलं होतं. सात वाजता येऊन गेलो पण तुम्ही नव्हतात.

मिलींदः कशा संदर्भात?

मुलगाः मी ते पत्रकारितेचा कोर्स केलाय. (बसायला जातो.)

मिलींदः अरे बापरे. का बरं? (तसाच उभा रहातो.)

मुलगाः (चपापतो. थोडासा गांगरुन) ते मला जर्नलिस्टं... व्हायचं होतं ना...

मिलींदः व्हायचं होत?

मुलगाः म्हणजे आहे. त्यासाठी! उमेश भोसले माझं नाव.

मिलींदः साताऱ्याचा का?

मुलगाः होय सर.

मिलींदः हं. छान वाटलं तुझं होय ऐकून. नाहीतर उमेदवार आला की खालच्या छापखान्यातल्या खिळयांसारखे छापील शब्द बोलतो.

मुलगाः (उत्साहाने) माझे बाबा कोठावळयांच्या भावाकडे काम करतात. सर त्यांनी ही चिठी दिलीय.

मिलींदः काय दिलीये?

मुलगाः चिटी चिटी! (त्याला देतो.)

मिलींदः (पहातो. थांबून) वाच बरं. तुझ्याच आवाजात.

उमेशः (लाजत) प्रिय मिलींद, चि उमेश हा माझ्या ओळखीतला अतिशय मेहनती आणि हुशार मुलगा आहे. शिवाय त्याला पत्र कारिता करायची इच्छा आणि भाषेची आवड आहे. कृपया त्याला मार्गदर्शन करावे.

मिलींदः (संशयाने) हे सगळं लिहीलंय का त्या चिठीत?

उमेशः (हसून) भाषेची आवड आहे मीच टाकलं. भाषेची आवड आहेच ना मला.

मिलींदः नोकरी हवीये का मार्गदर्शन?

मुलगाः नोकरीला प्राधान्य आहे. ती मिळाली तर मार्गदर्शन मिळत राहील की. (हळूच हसतो.) आणि माझी तयारी झालीये. पत्रकारितेची बरीच पुस्तक वाचून काढलीयेत सुटटीत. माझ्यामध्ये खूप जिदद आहे सर तशी.

मिलींदः हं... काय रे, बातमी म्हणजे काय?

मुलगाः (हळूच) तुमी आज निवांत दिसताय सर. नाही कोठावळे म्हणले होते, अर्ज ठेऊन घेईल आणि नंतर बोलवेल मिल्या. (गच्च डोळे मिटतो. मिलींद त्याच्याकडे एकटक पहातो.) असं... कोठावळे म्हणाले.

मिलींदः (सराईतपणे हसत) नाही, दोन एक महिन्यातनं एखादा दिवस येतो आमच्या इथं जेव्हा बाकीचेही काम करतात. (दोघं हसतात.) काय हो भोसले, बातमी म्हणजे काय?

मुलगाः (अचानक आलेल्या प्रश्नानं गडबडतो.) बातमी... बातमी म्हणजे महत्वाच्या घटनेचं तटस्थपणे केलेलं वृत्तांकन. घटनेचा आढावा.

मिलींदः अच्छा! म्हणजे समजा तू खालंन चाललायस, आणि समोर एका माणसाला कुत्रा चावला. ही बातमी होईल का?

मुलगाः हा हा कसं वाटेल ना आख्खा पेपर कुत्रा चावल्याच्या बातम्या. (मिलींद पहातो.) नाही. (थांबून) म्हणजे होईलही.

मिलींदः हे बघ. कुत्रा माणसाला चावला तर ती नॉर्मल घटना आहे पण समजा एखादा माणूस कुत्र्याला चावला तर मात्र ती बातमी. किंवा माणूस महत्वाच्या माणसाला चावला तर ती बातमी.

मुलगाः (पिशवीतून फाईल काढतो.) सर सर्टीफिकीटं...

मिलींदः राहू दे रे. फाईल बघून नोकऱ्या फक्त पिक्चर मध्ये देतात.

मुलगाः (स्वतःत) किमान पिक्चरमध्ये देतात तरी! बघा ना सर. प्लीज. प्लीज.

(मिलींद फाईल उघडून पहातो. मुलगा मागे येऊन उभा रहातो.)

मिलींदः चि उमेश भोसले. दोन गोळया सकाळ दुपार संध्याकाळ. (दचकून) काय रे?

मुलगाः आयला. सॉरी हां चुकून आलं ते.

मिलींदः खो खो दुसरा क्रमांक.

मुलगाः पत्रकाराला पळापळ करावी लागते ना.

मिलींदः हं. एखादं हस्ताक्षर स्पर्धेचंही असेलच. (शेजारनं एक बातमी आणि फोटो काढतो.) हे बघ, आज शहरातल्या सांस्कृतिक केंद्राची इमारत पडली. त्याखाली चार पाच लोकं गेली. हा एका लहान मुलीचा फोटो. काय कॅप्शन टाकशील या फोटोला?

(फोन वाजतो. तो दुसरीकडे जाऊन ताडकन उचलतो.)

मिलींदः हां दैनिक हिंदुस्थान. पेंडसे. अहो किती वेळा सांगितलं, जाहीरात विभाग वर आहे. आमच्या डोक्यावर. काय नंबर फिरवलात. ४१२२७६? बरोब्बर... चुकीचा नंबर फिरवलात. २७२ आहे! सातावर दोन!

मुलगाः (त्या फोटोकडे निरखून पहातो.) वाईट झालं हो सर!

मिलींदः कॅप्शन काय कॅप्शन?

मुलगाः भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते गेले. (मिलींद चमकून पहातो.) (अभिमानाने) एस एस सी ला दुसरा आलो होतो सर शाळेत. मराठीत पहिला. कॉलेज एसपी. तुम्हीपण एसपीचेच ना? (मिलींद मान हलवतो.) खरंतर आपण गेल्या वर्षी भेटलो होतो. तुम्हाला पत्रकारसंघाचा पुरस्कार मिळाला होता ना तेव्हा तुम्ही कोठावळे काकांच्या घरी आला होतात. सर, तुमची ती बातमी अजून लक्षात आहे माझ्या. खरंतर ती वाचूनच मला वाटलं होतं की आपणही पत्रकारिता करावी, आणि मी हे नोकरी मिळवण्याकरता नाही सांगते, मुददाम नमूद करतो.

मिलींदः आधी नुसतं भेटायचं मग, किंवा फोन करायचा.

मुलगाः दोनदा केला होता सर. कुणीतरी नेवळेकर म्हणून होते, ते म्हणले तुम्ही नाही आहात.

मिलींदः कुणीतरी नाही बाबा, संपादक आहेत ते.

मुलगाः मी निरोप पण ठेवला होता. माझ्यामध्ये खूप चांगुलपणा आहे सर तसा.

मिलींदः (मिलींद तुच्छपणे हसतो.) चांगुलपणा नॉर्मल हवेत टिकत नाही बाबा आजकाल, पटकन खराब होतो.

मुलगाः नाही सर, त्या दिवशी पहिल्या पानावर खाली जी बातमी आली होती अक्षरशः वाचून पेटायला झालं.

मिलींदः अँकर न्यूज म्हणतात त्याला. (थांबून) मार्गदर्शन!

(मागनं टेलीप्रिंटर धडधडतो.)

मुलगाः हे काय वाजलं?

मिलींदः टेलिप्रींटर आहे तो. कुठल्याही न्यूजपेपर ऑफीसचं ह्रदय! सारखं धडधडत असतं ते!

मुलगाः बघू का सर? जवळ जाऊन?

मिलींदः बघ की, तिकीट नाही लागत त्याला.

मुलगाः सर इथं आत काय आहे?

मिलींदः जा जाऊन बघ. बातमीदार बसतात. आता गेले असतील. इकडे कंपोझिटर. तिकडे ट्रान्सलेटर.

(मुलगा उत्सुकतेने आत जातो. परत फोन वाजतो.)

मिलींदः बोला. हो. नाही उदयाच्या वाचकांच्या पत्रव्यवहारात येईल का नाही कसं सांगता येणार? तुम्ही माजी मुख्याध्यापक आहात? अहो मग, छापायच्या आधीच पेपर कसा फोडू मी? उदयाच बघा तुम्ही.

मुलगाः (हसत हसत परत व्हरांडयातून येतो) भारी आहे हो ऑफीस. पेपर पण भारीच आहे तसा. हिंदुस्थान म्हणजे लोक एकदम आवडीने वाचतात. आमच्या इकडं स्टॉलवर पेपर नाही हिंदुस्थान दया म्हणतात. कॉलेजच्या कँटीनमध्ये परवाच मुलं बोलत होती हा भागवत आहे ना वेगळयाच बातम्या आणतो छापून. हे कोणाला सुचत नाही. (थांबून) तसं पेपराचं आणि तुमचं पण नाव आहे हां पुण्यात.

मिलींदः भाव्यांची कृपा (वरचा फोटो दाखवतो.) संस्थापक संपादक. आणि हे त्यांचं पहिलं टेबलं. आता जड झालंय. म्हणून बाहेर ठेवलंय. बरं वाटलं ऐकून. (अंदाज घेतं) आणि काय रे बातमीसारखी बातमी, एवढं काय वेगळं वाटतं त्याच्यात?

मुलगाः काय की खूप कमी वेळा होतं ना असं की सकाळी तुम्ही एक बातमी वाचता आणि मग दिवसभर वेगवेगळी लोकं वेगवेगळया पध्दतीनं त्या बातमीबददल सांगतात. आपल्याला एकाच बातमीचे वेगवेगळे चेहरे कळत जातात.

मिलींदः कुठल्या पुस्तकात वाचलं हे?

मुलगाः ओ नाही सर, आता तुम्ही लिहील होतं आश्रमातली मुलं विकली. कॉलेजमध्ये आल्यावर कळलं, की आश्रमाच्या ट्रस्टींनी गेली दहा वर्ष हिशोबच लिहीले नाहीयेत. म्हणजे भ्रष्टाचाराचा अँगल दिसायला लागला. कुणी सांगितलं की अनेक तंत्र मंत्र करणारे बाबा अशा मुलांना उचलतात. म्हणजे नरबळी सारख्या सामाजिक गोष्टीवर प्रकाश पडला. आश्रमशाळेच्या स्वच्छतेचे आणि मुलांच्या सुरक्षिततेचे आदेश निघाले म्हणजे सुव्यवस्थेचा मुददा आला. बघा एका बातमीनं कुपोषणापासून भ्रष्टाचारापर्यंत आणि अंधश्रध्देपासून सुव्यवस्थेपर्यंत सगळं सांगितलं. दोन दिवस त्या बातमीन सगळीकडे माझ्याबरोबर प्रवास केला. तिचं रुप बदललं. आणखी व्यापक झालं. सांस्कृतिक, सोज्वळ, दिखाऊपणा उघडा पडला! तुम्हाला सांगतो हे रोजचे फीत कापायचे आणि दीप प्रज्वलनाचे फोटो आणि सात वाजता येणाऱ्या अळणी ठळक बातम्या पाहून कंटाळायला होत हो लोकांना, अशा वेळेला तुमच्यासारखी एक बातमी ढुंगणाला चिमटा काढते चाटकन. सॉरी हां आपली भाषाच जरा अशी आहे.

मिंलीदः छान आहे.

मुलगाः छान आहे? (खूश होत. उत्साहाने) त्या रात्री झोपताना वाटलं बर का, अशा एका पत्रकारामुळं काही मुलांचे तरी जीव वाचले असतील, काही मुलांना स्वच्छ अन्न आणि पोटभर जेवण मिळालं असेल. वर्षानुवर्ष त्यांना पिळणाऱ्यांना एक दिवस तरी झोपताना धडकी भरली असेल. म्हणून वाटलं आपण पण पडावं याच्यात, कारण आपल्याला पण अन्याय सहन होत नाही. कोठावळे म्हणाले तुम्हाला धमक्याही आल्या होत्या बाहेरुन!

मिलींदः आम्हाला धमक्या फक्त बाहेरुनच येतात असं कुणी सांगितलं? (मुलगा अवाक) म्हणजे कुठनंही येतात. तुला माहीतेय मला काय बक्षीस मिळालं त्या बातमीचं?

मुलगाः पत्रकार संघाचा पुरस्कार मिळाला की एवढा. (हळूच) आणखीन काही मिळालं का?

मिलींदः आयटम्स. (थांबून) ते आयटम्स आण मघाचचे.

मुलगाः (दचकून) काय?

मिलींदः आमचं हृदय आहे ना, तिथं दर काही मिनिटांनी पीटी आय यू एन आयच्या न्यूज येतात. स्टेट लेवलच्या, नॅशनल लेवलच्या. महत्वाच्या. आणा त्या फाडून. त्याला आयटम म्हणतात.

मुलगाः मार्गदर्शन!

मिलींदः हं. पीटीआय म्हणजे?

मुलगाः प्रेस ट्रस्ट ऑफ इंडीया. यू एन आय म्हणजे.

मिलींदः युनायटेड नेशन्स ऑफ इंडीया!

मुलगाः करेक्ट!

मिलींदः कपाळ तुझं! (मुलगा हिरमुसतो.)

मिलींदः (हसतो.) फुलफॉर्म लक्षात नसला तरी चालेल. काम लक्षात ठेवा. (मुलगा हसत हसत तिथे जातो. लगबगीने ते फाडून आणतो.) जा राजा, शेजारच्या सेक्शनमध्ये देऊन ये. सांग भागवतांनी दिलेत ट्रान्सलेशनला. कुठली कुठली पानं गेली विचार! (त्याला ते आयटम्स देतो.)

मुलगाः सर मी अजून खूप वेळ गप्पा मारु शकतो पण मला सांगा ना मला मिळेल का नोकरी? मी तुम्हाला हमी देतो, मी खूप चांगलं काम करीन, एक आदर्श पत्रकार...

मिलींदः जा तू जाऊन तर ये.

(मुलगा जातो. आणि ते कागद देऊन येतो. मिलींद तो पर्यंत स्वेटर काढून घडी घालून ठेवतो.)

मुलगाः च्यायला पेशवे बागेतल्या सिहांची आठवण झाली, त्या ढापण्या काकांनी ओरबाडले कागद.

मिलींदः इथं माणसं आख्ख्या माणसांना ओरबाडतात, कागदाचं काय घेऊन बसलास बाबा!

मुलगाः सर तुम्ही घाबरवताय ना मला?

मिलींदः गम्मत रे! बाकी काय करतोस?

मुलगाः गेली तीन वर्ष रात्रशाळेत शिकवतो. कष्टकरी पोरांना  कुणी बेकरीत काम करतं, कुणी गॅरेजमध्ये, कुणी दिवसभर कल्हई  करत फिरतो कुणी गाडी ओढतो. पण भेटल्यावर पहिलं काम, पेपर वाचायचा.

मिलींदः शिळा पेपर?

मुलगाः शिळया अन्नावर जगणाऱ्या लोकांना ताज्या पेपराचं काय कौतुक? त्यांना उदया सांगेन ना मी तुम्ही भेटला होतात. तुमची बातमी यीलच ना, ती दाखवीन वाचून.

मिलींदः कविता आवडतात का? भिंत खचली, चूल विझली सुचवलंस म्हणून...

मुलगाः आवडतात पण जमत नाहीत. माहीतेय आपल्याला. पण सर एक दोन पोरांनी केल्यात. कसली गम्मत आहे बघा ना, त्यांनी काहीतरी लिहीलं, त्यांना माहीत पण नाही आणि त्या कविता झाल्या.

मिलींदः उमेश. (थांबून) उदया घेऊन ये येताना. मी असलो तर वाचू आपण तुझ्या आवाजात.

मुलगाः सर म्हणजे तुम्ही, मला?

मिलींदः आवडलास तू मला. पैसे किती माहीत नाही पण बुध्दीला आणि कष्टाला मान दयायची व्यवस्था नक्की करीन. चालेल का?

(मुलगा सदगदित होऊन पाया पडतो. मिलींद थांबवतो.)

मुलगाः सर एक सांगतो, अगदी तुमच्यासारखी खरेपणानं बातमीदारी करीन मी. त्यासाठी भांडीन.
उभा राहीन. कोणालाही दबणार नाही. काही चुकल तर हक्कान भोसले म्हणा अन दोन थोतरीत हाणा!
येऊ मी?

मिलींदः काम नाही करणार?

मुलगाः आत्तापासनं? (खूश होतो) करतो की. (थांबून) मी खरं सागू का?

मिलींदः खरं बोलायला परवानगी कशाला लागते?

मुलगाः नाही मला वाटलेलं हे कोठावळे नुसतेच बोलायला राघू आहेत. पण चक्क कामाचे निघाले हो.
(मिलिंद हसायला लागतो.) काय करु बोला!

मिलींदः गाडी चालवता येते का?

मुलगाः हरक्युलीस आहे ना आपली, टनाटन जातो पायडल मारत, सांगा कुठे जायचंय!

(मिलींद त्याला खुणेनीच थांबायला सांगतो आणि फोन उचलतो.)

मिलींदः माने, नमस्कार. भागवत, दैनिक हिंदुस्थान. सांस्कृतिक केंद्राचं काम! हां सांगा? मे १९८८, किती पंचवीस लाख, वाढीव? बारा लाख, शिंदयांनी बंगला कुठे घेतला? अरण्येश्वर! वा वा. नाही नाही हे कसं छापेन? कच्च्या मालाचं कोण सांगू शकेल? दया नंबर दया. ४१२२३४. ओ के. नाही नाही अहो अजून ब्लॉक बिकचं काही नाही. वडलांच आजारपण चालू आहे. किडनी. छे हो, त्याच्यातच एखादा ब्लॉक जाईल. (खिन्नपणे हसतो.) ठेवतो.

(दुसरा नंबर फिरवतो. एकदम निवांत होतो.)

मिलींदः काळे नमस्कार, भागवत, हिंदुस्थान मधून. काही नाही हो सहज गप्पा मारायला फोन केला. काय म्हणतायत वहीनी? मुलाची दहावी? जोग क्लासेस का? चांगले आहेत. हो आलं माझ्या कानावर. तीन चार जण गेलेत. बारा पंधरा लाख टाकले असणार आतल्या आत. आँ? नाही हो. एवढं नसेल! काय सांगता? हो मी करणारच आहे. छापतो. नाही नाही कुणीतरी छापायलाच पाहीजे ना? मग? कागदपत्र घ्यायला पाठवतो उमेश भोसले नावाच्या मुलाला! बघा उदयाची बातमी, तीच भिंत नाही यांच्या अंगावर पाडली ना... (थांबतो.) पाठवतो. समीर ला प्रिलीमसाठी ऑल द बेस्ट, (अचानक) सुयश नाव आहे का? बरं बरं! बघा उदयाची बातमी. (फोन ठेवतो.) जाशील का अरण्येश्वर ला? फडतरे चौकातनं डावीकडे गेलास की दुसऱ्या गल्लीत काळयांचं घर आहे. त्यांच्याबरोबर ऑफीसला जा आणि कागद घेऊन ये.

(उमेश त्यांच्याकडे हसून पहातो. मिलींद त्याला खिशातनं पाच रुपये काढून देतो. उमेश नको म्हणतो)

उमेशः पहिल्या दिवशी वाईट सवयी नका लावू सर! तुमच्या हाताखाली काम करायला मिळतंय अजून काय पाहीजे.

(त्याला परत नमस्कार करतो.)

(हसून ताडकन निघून जातो. मिलींद त्याच्याकडे पहात रहातो)

मिलींदः (स्वतःतल्या स्वतःत) भावे, काय सालं नशीब आहे. दिवसभर स्वतःवर कुढाव तर रात्री असं कुठूनतरी, कुणीतरी येऊन तुम्हाला अशी पोचपावती देतं. काम करताना कळत नाही पण असतो आपण कुणीतरी. आपण आपलं काम नीट करतो याचा कुठेतरी कोणाला तरी आनंद होत असतो, कोणाला तरी अभिमान वाटत असतो. आपल्याला आपल्यावर विश्वास वाटायला लागतो अचानक. चला, भोसले राबतायत उदयाच्या महत्वाच्या बातमीसाठी.

(हे जाणवतं तसा मिलींद लिहायला बसतो. झपाझप लिहीतोय. जणू त्याला स्पीड सापडलाय. मधूनच तो थांबतो. आहे त्या मजकुराकडे पहातो. इकडे तिकडे पहातो. घडयाळात पहातो. त्याच्यावर दोन तीन वेळा बोट आपटतो. ते चालू होतो. झपाझप लिहीतो. लिहून पूर्ण होतं. तसाच बसतो. गिरीधर चहा घेऊन येतो.)

गिरीधरः सात आणि नऊ झालेत.

मिलिंदः ठीके. हे टायपिंग ला दया. झालं की घ्यून या.

(तो बातमी घेऊन निघून जातो. मिलींद थोडा रिलॅक्स होतो.)

(मिलींद बॅगेतनं एक जुनी कॅसेट काढतो. मुददाम त्यातली टेप बाहेर काढतो. त्याकडे पाहून हसतो. पेन्सिल त्यात घालून रिवाईंड करतो आणि ‘लग जा गले’ गाणं लावतो. त्याच्या सुरावटीवर खिडकीपाशी जातो. त्याचा आणि थंडीतल्या चहाचा आनंद घेतो. बाहेर पहातो. किंचीतसं धुक पसरलेलं. शेजारी जाऊन खुर्चीत बसतो. पेन पडतं म्हणून उचलायला वाकतो.  एवढयात दार उघडून शोधत एक बत्तीशीची मुलगी आत येते, ही **स्वप्ना जोग,** अतिशय पॉश, आवरुन आलेली, प्रोफेशनल वाटणारी, केसांचा नीट भांग पाडलेली चापून चोपून साडी नेसलेली, समोर उभी रहाते.)

स्वप्नाः एक्सक्युज मी... नाईटला कोण असतं?

(मिलींद वर पहातो. झपकन उभा रहातो. दोघं एकमेकांकडे थक्क होऊन पहातायत. स्वप्ना काहीच बोलत नाही. दीर्घ श्वास घेऊन बाजूला होते. चेहऱ्यावर कमालीचा ऑकवर्डनेस. मिलींद  करारीपणे तिच्याकडे पहातोय. टेलिप्रिंटर वाजतोय. त्याच्याजवळ जाऊन उभा रहातो. तिच्याकडे पहात रहातो. अंधार.)

**प्रवेश दुसरा**

(स्वप्ना मिलींद च्या डेस्कजवळ उभी आहे. एक शाईपेन पहाते. ते उचलते. त्याचं टोपण उघडून वास घेते. तिला बरं वाटतं. त्याने दोन तीन रेघोटया मारते. टोपण लावते. इतक्यात मागून मिलींद येतो. मुददाम खोकतो. अचानक पुढे होतो. रुमालाची घडी घालून टेबलापाशी येतो. मधूनच तुटक हसतो.)

स्वप्नाः वाटलं नव्हतं तू नाईटला असशील.

मिलींदः आजपासनच. का गं? काही काम होतं का?

स्वप्नाः नाही नाही, सहज खालन चालले होते, म्हणलं बघावं, कुणी भेटतंय का. नेवळेकर?

मिलींदः शिमल्याला गेलेत. ऑफीसच्या कामासाठी. सहपरिवार.

स्वप्नाः बरं बरं. (थांबून) तू, कसा आहेस? हेअरस्टाईल बदलली जरा... (तो केसांवरनं हात फिरवतो.)

मिलींदः (तुटक मिष्कीलपणे) छे गं, भांग पाडायचा राहीला असेल! (तिला न्याहाळत) तू काय मूर्तिमंत श्रीमंत दिसायला लागलीस आता!

(स्वप्ना हळूच हसते.)

स्वप्नाः घरचे बरे आहेत का?

मिलींदः हं.

स्वप्नाः अण्णा आजारी आहेत ना?

मिलींदः (तिडीकीने) तू का बाहेरनं चौकशा करत असतेस गं? मध्ये कधी तरी गिरीधर ला भेटलीस ना...

स्वप्नाः बायको वगैरे काय म्हणतेय? मुलगा पण आहे ना तुला?

मिलींदः बायकोचं नाव स्वाती आणि मुलाचं नाव अक्षरच ठेवलंय. आम्ही वन रुम किचनमध्ये रहातो आणि आमच्याकडे एम एटी पण आहे. अजून काही?

स्वप्नाः (ती त्याच्याकडे पहात) तुझ्यासारखा असेल अगदी. मुलगा.

मिलींदः नाही सुदैवानी. आईवर गेलाय. भागवतांकडे मुलं मातृमुखी आणि बाप मृत्यूमुखी!

स्वप्नाः (किंचीत हसत) अण्णा म्हणाले होते मला. यायचंय एकदा त्यांना भेटायला. वेळच मिळत नाही!

मिलींदः (थेट) नाही भेटणार तुला ते. कधीच.

(प्रचंड शांतता. खालून दुकानाचं शटर बंद होण्याचा आवाज येतो.)

स्वप्नाः हं (इकडे तिकडे पहात) दहा वर्ष झाली.  (थांबून) काळ काय बदलतो नाही?

मिलींदः (रोखून पहात) आणि माणसं?

स्वप्नाः मला खरंच वाटल नव्हतं तू असशील आत्ता.

मिलींदः तुला आश्चर्य वाटतंय का दुःख?

स्वप्नाः आश्चर्य! (तुटक हसत इकडे तिकडे पहात, खिडकीपाशी जात) ऐ पण ऑफीस तसंच आहे.

मिलींदः जागांना माणसांसारखा मूड नसतो ना. त्या तशाच रहातात.

(तिला ते जाणवंत. ती खिडकीतून नजर टाकतेय. खांदे आत घेत.)

स्वप्नाः आज थंडी जरा जास्तच आहे नाही. आत्ता खालून आले तर हा रस्ता इतका बदलला होता की माझा विश्वासच बसेना. ते कानिफनाथ रसाचं गुऱ्हाळ, त्यातला तो घुंगरांचा आवाज, भेळेची गाडीवरची पातेल्यातली ठाकठूक आणि गॅसबत्तीच्या दुकानातनं येणाऱ्या गरम वाफा सगळं गेलंच. काहीतरी वेगळचं आलय रे त्या जागी.

(दोघं एकमेकांकडे पाहून तुटक हसतात.)

स्वप्नाः मग आता पेजिंग बिजिंग कोण ठरवतं?

मिलींदः आज तरी मी. सोनावळे नेमका रजेवर आहे. तू काय सहजच?

स्वप्नाः हो रे. पार्टी होती आज, त्यासाठीच या भागात आले होते, मग म्हणलं जाताजाता,

मिलींदः जाताजाता बघावं, गरीब माणसं कशी जगतात. ते फॉरेनर येतात ना भारतात गरीबी बघायला तशी आलीयेस तू. कसं वाटतंय?

स्वप्नाः चार पाच वेळा दिसला होतास तू मला. इतकी इच्छा झाली होती तुला भेटायची.

मिलींदः नको नको. मला खरं वाटेल.

मिलींदः पण नाही भेटलीस. मग काय दुसरीकडे शिफ्ट झालीस.

स्वप्नाः (थांबून थेटपणे.) तू नाही काढत का माझी माहीती बाहेरुन?

मिलींदः (सावरासावर करत) गिरीधर नी सांगितलं, मी कशाला विचारतो?

स्वप्नाः खरंच खूप इच्छा होती तुला भेटायची पण... पण नाही भेटता आलं.

मिलींदः समजू शकतो गं मी. तू अशी फॅन्सी साडी, स्नो पावडरचा फवारा, मोत्याचा माळा, सेंटेंड रुमाल वापरत प्रिमियर पदमीनीतनं जाणारी आणि मी असा कुठंतरी अमृततुल्यात बशीतनं फुरर्र करुन चहा पिणारा, पेट्रोल संपलेली गाडी ढकलणारा, अजागळ, घामेघूम,मराठी पेपरचा सडाफटींग उपसंपादक! ऐकायलाच ऑड वाटतं, भेटायला तर किती वाटलं असतं.

स्वप्नाः आता तरी वेळेवर पेट्रोल भरत जा. (मिलींद तिच्याकडे रागाने पहातो.) जरा चहा सांगता येईल का? (मिलींद तिच्याकडे पहात राहीलाय.)

मिलींदः यावेळेला चहा पितात हाय लेवलची लोकं?

स्वप्नाः पितात, तुला काही प्रॉब्लेम? चालेल ना मी चहा पिऊन गेले तर? (थांबून) बसू ना इथे? म्हणजे चालेल ना? का दुसऱ्या कुणाला सांगू?

(ती वळते. खिडकीपाशी जाते. तो तिला न्याहाळत उभा आहे.)

स्वप्नाः (हाक मारत) बन्सी? जरा बन्सी को...(थक्क होते.) हा बन्सी आहे? बाप रे! मिशा कधी फुटल्या याला? हाफपॅट मधून फुल पँट मध्ये प्रमोशन झालं याच तर! पहचाना? मैं हु मैं! मैं हु मैं!

मिलींदः स्वप्ना दीदी!

स्वप्नाः अरे नही क्या, मेरी सायकल पे घूमा करते थे हम यहाँ से शनिवार वाडा! नही क्या... वो बर्फका गोला तीन कलर का, ऑरेंज येल्लो कालाखटटा... नही क्या?

मिलींदः राहू दे. त्याचं हिंदी बिघडेल. (त्याला) दो स्पेशल.

स्वप्नाः (एकदम हसत) केवढा वेगळा दिसतोय.

मिलींदः मी रोजच बघतो.

स्वप्नाः असं एकदम आठवलं रे सगळं. आपलं उन्हाळयातलं शनिवार वाडयाच्या मैदानावरचं सायकलिंग. दिवाळीत याला दिलेली नागगोळयांची पाकीटं, याला भिंतीला धरुन तू उभं केलं होतंस आणि माझ्या रबरबँडनी केसांचा बो बांधला होता. जो बोंबलत सुटला होता. काय उच्छाद घालायचा हा ऑफीसभर. गिरीधर म्हणायचा तुम्हीच दत्तक घ्या. हवं असेल तर मी पावसाळयातल्या रात्री डोक्यावर टोपली घेऊन घरी आणून सोडतो. (हसते.) बाप रे. मला थेट तो बन्सी आठवला. (थांबून) आज काय फार गडबड आहे का बातम्यांची?

मिलींदः छे, कसली गडबड? टेलिप्रिंटर वर येतायत बातम्या, त्याचंच ट्रान्सलेशन चालू आहे मागे. सत्ताधारी विरोधक बाचाबाची आहे, भारत रशिया करार आहे ज्याचं पुढं काय होणार दोन्ही देशांना माहीती नाहीये. तीन वर्ष तुंबलेले पुरस्कार आहेत. राज्याच्या राजकारणात एक मोठी खळबळजनक बातमी येणार अशी शक्यता आहे, कारण सत्ताधारी पक्षाच्या प्रदेश कमीटीची बैठक आता संपेल, लोकल सांगायचं झालं तर आजच

संध्याकाळी शहरातल्या सांस्कृतिक  केंद्राची इमारत पडलीये, त्याखाली तीन चार मजूर आणि एक लहान मुलं गेलंय. सिटी एडिशन गेलीये आणि मला लेट सिटी एडिशन ला ही बातमी लावायचीये.

स्वप्नाः अरे अरे, फारच वाईट झालं.

मिलींदः काय गं?

स्वप्नाः ते भिंत पडली.

मिलींदः (उपहासानं) काय त्यात? रोजचं आहे गं. इमारती कोसळतात, माणसं गाडली जातात, फायरब्रिगेडची लोकं ढिगारे उपसतात, त्यांना बाहेर काढतात. मग आमच्यासारखे हुशार पत्रकार त्यांची फोटो सकट बातमी देतात. वर देव तारी त्याला कोण मारी वगैरे असली टायटल्स देऊन वाचलेल्या माणसांचे बॉक्स बिक्स टाकतात.

स्वप्नाः लोकं वाचून दोन क्षण हळहळतात, पान उलटतात आणि सोडून देतात.

मिलींदः करेक्ट (उठून बाहेर येत) मी ही तोच विचार करत होतो कशाला दयायची ही रुटीन ॲक्सीडेंट बातमी? काय होणार यानी?

स्वप्नाः खरंय!

मिलींदः (एक एन्व्हलप काढतो.) पण मग भिडे नी काढलेला हा फोटो पाहीला आणि हलायला झालं. झोपडीच्या बाहेर खेळत होती म्हणून वाचलेल्या दहा अकरा वर्षाच्या मुलीचा फोटो. (फोटो काढतो.) हे बघ, तीनं तिच्या ढिगाऱ्याखालनं बाहेर काढलेल्या मेलेल्या भावंडाला मांडीवर घेतलंय.

(फोटो दाखवायला तिच्या मागे जातो. जणू तो तिच्यावर व्यापून उभा आहे.)

स्वप्नाः (पाहून न पाहील्यासारखा करते.) बाप रे!

मिलींदः बघ ना, दिसायला एक मुलगी, तिच्या मांडीवर भावंडाच प्रेत. मागे विटांचा खच, सिमेंटचा लगदा, उध्वस्त झोपडी. तिचे डोळे बघ. सैरभैर. व्याकुळ. आपल्याशी का कुणी बोलत नाही, तिला बिचारीला कळतही नाहीये. उजवा हात बघ. त्या मुलाच्या डोक्यावर. हललो हा फोटो पाहून. भूमिहीन असणार किंवा दलित. गावाकडे नीट जगायची सोय नाही म्हणून बिचारे शहराच्या आश्रयाला आलेले. कसला आगापिछा नाही, कुणी नातेवाईक नाही, कॉन्ट्रॅक्टर नं डबल कष्ट आणि अर्ध्या पैशात काम दिलं आणि वर दिली भिंती खालीच झोपडी ठोकून. आता पडली आख्खी भिंतच्या भिंत अंगावर. आणि त्यात गेलं कोण? दहा महिन्याचं तान्ह पोरं. ज्याला महाराष्ट्र माहीत नाही, दलित माहीत नाही, संस्कृती माहीत नाही आणि मरणही माहीत नाही.

स्वप्नाः (अनाहूतपणे) आई ग्ग!

मिलींदः खरचटल्यासारखं आई ग्ग केलसं गं स्वप्ना! सत्तर फूट लांबीची भिंत, दुपारचं जेवण संध्याकाळी जेवणाऱ्या मजूरांवर आणि शेजारी साडीत गुंडाळलेल्या पोरावर पडते तेव्हा त्या तोंडातनं काय बाहेर पडत

असेल? भिडे म्हणाला बाहेर काढलं तेव्हा खरकटे हात तसेच होते. सुखाचं जेऊही दिल नाही बघ मरायच्या आधी.

स्वप्नाः हं.

मिलींदः मग वाटलं ही एकमेव जिवंत राहीलेली दहा अकरा वर्षाची मुलगी. कुठं जाईल? कशी व्यवस्था लागेल तिची? कोण तिला सांगेल की बाई, आता तुझं कुणीही नाही. हा सगळा विचार केला आणि मग वाटलं, बातमी तर छापलीच पाहीजे. डबल कॉलम,फोटोग्राफ. हयांच्याबददल कोण लिहीणार नाहीतर?

स्वप्नाः हं

मिलींदः तुला  माहीतेय या कामाची कुदळ हाणली तेव्हा मी गेलो होतो रिपोर्टींगला. (स्वप्ना हो?) महापौर म्हणाले शिवबा आणि जिजाऊंनी पुणं सोन्याच्या फाळानं नांगरलं, त्याचं ऐतिहासिक पुण्यात आता आधुनिक महानगराची पायाभरणी होणार. त्या दिवशी मारलेली ती कुदळ आज या तान्हया बाळाला बसली.

स्वप्नाः तूच मला शिकवलं होतंस पत्रकारानं रिपोर्टींग करावं. एवढं सेंटीमेंटल असू नये.

मिलींदः (एकदम बदलत) का? पत्रकार हाडामासाचा माणूस नसतो? ठेच लागली की त्यालाही रक्तचं येतं आणि दुःख झालं की पाणी. आणि तू विचारलंस म्हणून बोललो. बातमीत हे सगळं छापण्याएवढा बेअक्कल आहे का मी?

स्वप्नाः तसाच बोलतोस हां तू अजूनही. बेअक्कल. सडाफटींग. मूर्तिमंत.

(चहा घेऊन एक मुलगा येतो. ती चहा घेते. एक त्याला देते. एक स्वतः घेते. चहाचा एक घोट घेऊन तिला बरं वाटतं. ती पुन्हा एकदा फोटोकडे पहाते.)

मिलींदः भिडे फार चांगले फोटो काढतो. शिवाय मागे व्यवस्थित माहीती लिहीतो. चेतकवर टांग मारुन जातो कुठे कुठे. त्या बिल्डरच्या ऑफीसवर गेला होता पठठया. काय नाव त्यांचं?

स्वप्नाः (नकळत) संकलेचा.

मिलींदः हां!! संकलेचा (एकदम चपापतो.) तुला काय माहीत गं?

स्वप्नाः मोठी कंपनी आहे. (त्याच्याकडे रोखून पहाते. शांतपणे) तू सिटी एडिशन ला दिलीयेस बातमी?

मिलींदः हं. थोडक्यात. इंटरेस्ट लोकल आहे ना. लेट सिटी ला मोठी देणार. दणदणीत!

स्वप्नाः पण मग लोकलच होती तर मग सिटी ला कशाला? म्हणजे देतात का?

मिलींदःम्हणजे काय? सांस्कृतिक राजधानीत सांस्कृतिक केंद्राची इमारत पडते. कळुदे की बाहेरगावच्यांना,

स्वप्नाः त्यात तू एवढं मनावर घेऊन लिहीणार म्हणजे... बघू एकदा कॉपी!

(एक जण टाईप केलेली कॉपी घेऊन येतो. ती ते पहाते. कॉपी हातात घेते. अधाशासारखी वाचायला लागते. मध्येच पेन्सील उचलून शेजारच्या पेन्सिलीनं दोन तीन खुणा करते.)

स्वप्नाः मिलिंद, (थांबून) हे हवंय का रे?

मिलींदः (अनाहूतपणे. त्याच्या कामात गढून गेलेला) काय गं?

स्वप्नाः कोसळलेल्या इमारतीचं बांधकाम संकलेचा यांची इंडीया बिल्डर्स करत होती. सत्तर फूट लांबीची भिंत कशी कोसळते? तसेच या इमारतीचे प्लॅन्स कोणी मंजूर केले याचीही चौकशी झाली पाहीजे. इंडीया बिल्डर्स च्या इतर सगळया सरकारी इमारतींची ही चौकशी व्हायला पाहीजे असी मागणी कामगार संघटनेनं केली आहे.

मिलींदः (एकदम) हवयं का म्हणजे? का? का नको?

स्वप्नाः काय आहे ना. उगाचच एक नाव आलंय त्यात! (थांबून) या अॅक्सीडेंटचा आणि या कंपनीचा काहीही संबंध नाही तसा. म्हणजे हे खरं आहे की कल्चरल सेंटरच्या इमारतीचं बांधकाम आमची कंपनी करतेय. पण...

मिलींदः तुमची म्हणजे?

स्वप्नाः अरे मी...(थांबून सगळा श्वास एकवटत) मी इंडीया बिल्डर्स कडे काम करते. मी तिथे पब्लिक रिलेशन ऑफीसर म्हणून जॉईन झालेय, एक महिन्यापूर्वी.

मिलींदः (हसतो.) आणि त्यांनी तुला पाठवलंय, बातमी येऊ दयायची नाही म्हणून?

स्वप्नाः आणि मला माहीत नव्हतं की नाईटला तू असणारेस.

मिलींदः देवावर आणि दैवावर विश्वास नव्हता माझा, आज बसला. (एकदम हसत) काय? नाव काढून टाकायचंय?

स्वप्नाः (निश्वास टाकत) हां, म्हणजे मला तुला हक्कानं रिक्वेस्ट करायची होती. मी त्यांना म्हणाले माझाच पेपर आहे, मी एक वर्ष काम केलंय आणि माझे एक दोन मित्रपण आहेत तिथे. कदाचित मी रिक्वेस्ट केली तर... म्हणजे काढता येईल ना तेवढं? बघ ना!

मिलींदः (तिच्याकडे पहात, हसत ) तू एवढयासाठी इथं आलीस?

स्वप्नाः हो ना! माणसं कितीही हक्काची असली तरी जाऊन भेटावं लागतंच.

मिलींदः म्हणून एवढया रात्री एकटी आलीस तू?

स्वप्नाः आता काय करणार त्याला? पण मला वाटत होतं हां, इथं सगळयात पटकन काम होईल. थँक्स.

मिलींदः (तिच्याकडे पहात) मला मान्य आहे मी सामान्य आहे पण मलाही मेमरी आहे अगं.

स्वप्नाः (चमकून) म्हणजे?

मिलींदः दहा वर्षात तुला एकदाही वाटलं नाही हा जिवंत आहे का मेलाय, आणि आज तू माझ्या खांदयावर हात ठेऊन सरळ हक्कानी रिक्वेस्ट करायला आलीस! कमाल आहे तुझ्या निरलज्जपणाची.

स्वप्नाः मला माहीत नव्हतं तू नाईट शिफ्टला असणारेस. लेट मी क्लॅरिफाय.

मिलींदः कशाकशाबददल? तुझ्या डोक्यात काय चाललंय माहीतेय? हा एक गरीबडा गांजलेला उपसंपादक आपला जुना प्रियकर आहे. त्याला जरा जुन्या गोष्टींचा उजाळा दिला की तो वितळेल आणि म्हणेल चल गं ठीके नाही छापत बातमी. एवढं काये? मग तू पाच पन्नास रुपये त्याच्या हातावर टेकवशील की झालं. तो धन्य आणि तू निश्चिंत.

स्वप्नाः तुझी हिच किंमत आहे का रे माझ्यालेखी?

मिलींदः तुला माझी किंमत माहीती असती तर तू कदाचित आली नसतीस. (थांबून) किंवा गेलीही नसतीस.

(तिच्याकडे जळजळीत कटाक्ष टाकतो. दोघं एकमेकांकडे थबकून पहातायत.)

स्वप्नाः दोन्ही गोष्टी माझ्या हातातल्या नव्हत्या.

मिलींदः सोड. बातमी येणारे. तीही अशीच. तू, तुझे सर, त्यांचा बाप, कोणीही येऊ दे!

स्वप्नाः तीन वाक्य काढता येऊ शकतात हां कम ऑन!

मिलींदः माझ्याकडनं शिकलीयेस रिपोर्टींग याची तरी लाज ठेव. (ती ओशाळते.) झाला चहा पिऊन?

स्वप्नाः (त्याच्याकडे रागाने पहात) निघते.

मिलींदः कशी जाणारेस?

स्वप्नाः तुला काय करायचंय?

मिलींदः तसं नाही, एक पध्दत असते विचारायची.

स्वप्नाः नको उगाच सौजन्य दाखवूस.

मिलींदः रात्री एकटी चाललीयेस म्हणून.

स्वप्नाः मला वाटतंय आपण काहीतरी मार्ग काढू शकतो.

मिलींदः पैसे, प्रेशर किंवा प्रेम सोडून काही असेल तर सांग, नसेल तर प्लीज जा.

स्वप्नाः येते मी.

(स्वप्ना उठते. पर्स हातात घेते. जायला निघते.)

मिलींदः (डेस्कवर उचकापाचक करत) पेन कुठे गेलं... (खाली वाकून पहातो. थोडा पॅनिक होतो.)

स्वप्नाः (वळते, पर्समधून पेन काढते.) पेन.

मिलींदः नको मला.

स्वप्नाः राहू दे. प्लीज याला तरी नाही म्हणू नकोस. (थांबून) घे!

मिलींदः (तिच्याकडे पहात, पेन हातात घेतो. खोचकपणे) बॉलपेन?

स्वप्नाः सरांनी खास दिल्लीच्या एक्सीबिशन मधून आणलाय. चार रंगाचं आहे. हिरवा, निळा, लाल आणि काळा. जास्त टिकतो. शिवाय शाई सांडण्याची भिती नाही.

मिलींदः हं... (रोखून पहात) आणि वासाचं काय?

स्वप्नाः शाईचा वास घेण्याएवढा वेळ कुणाला असतो आता?

मिलींदः हो? मग आल्या आल्या माझं पेन का पर्समध्ये टाकलंस?

(स्वप्ना पकडल्यागत उभी आहे. शांतपणे थिजलेली. पर्समधून त्याचा पेन काढून ठेवते. त्याच्याकडे पहाते आणि अचानक फुटते. रडायला लागते. तो तसाच पहातोय. तिला आजिबात स्पेशल वाटू देत नाहीये. तीचा भर ओसरतो आणि ती पहाते.)

स्वप्नाः माझी चूक नव्हती. एकदा तुला सांगायचं होतं.

मिलींदः नको तो विषय. मला या पेनची सवय झालीये इतकंच!

स्वप्नाः अजून ठेवलायस!

मिलींदः काय आहे ना, पेन टिकलं गं जास्त आपल्या प्रेमापेक्षा. असो. दहा वाजून गेलेत. घरचे वाट पहात असतील. जा तू.

स्वप्नाः सुनिल नाहीये पुण्यात. (एकदम) मी, मी थांबू का फक्त थोडा वेळ? मला एकटयाला भिती वाटते जायला.

मिलींदः नको. तू थांबून परत तोच विषय काढशील.

स्वप्नाः (अजीजीने) नाही, मी परत तो विषय नाही काढणार. फक्त थांबते थोडावेळ. बसते नुसती हवंतर. दमलेय दिवसभर. तीन चार पेपरच्या ऑफीसेस मध्ये जाऊन आलीये संध्याकाळ पासनं. सगळयांना मॅनेज करता करता नाकी नऊ आले. प्लीज फक्त बसू दे थोडावेळ.

मिलींदः हळू हळू माझं मत बदलेल वगैरे असा विचार नाही ना तुझा?

(मिलींद निघून जातो. ती खिन्नपणे हसते. दोन क्षण जातात. ती शांतपणे बसलेलीच आहे. अचानक एक दोन टेलीप्रिंटर धडधडतात. ती सँडल काढून बसते. पाय मोकळे करते. मान मागे वळवते. तेवढयात मागून चहावाला येतो. तिला दचकून घाबरुन पळतो. ती हसते. तेवढयात मिलींद परत येतो.)

मिलींदः चौवेचाळीस वर्ष झाली पेपर सुरु होऊन पण अजूनही स्टाईलबुक मधनं शब्द सांगायला लागतात. पेज ले आउट करणारे तर कुठल्या पानावर कशापाशी कुठली बातमी लावावी काही सेन्सच नाही. देशात महिला सगळयात सुरक्षित या गृहमंत्र्याच्या भाषणाखालीच बलात्काराची बातमी लावशील का तू? मागेही असाच घोळ घातला होता यांनी. झाशीच्या राणीच्या पुण्यतिथीचा सोहळा झाला, ऐनवेळी त्याचा फोटो काढून शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा फोटो ब्लॉक ठरला. दोन शेतकरी हातात उस घेऊन पोलिसांना बडवतायत आणि खाली लाईन “मेरी झाँसी नही दूंगी अशी ललकारी तर यांच्या ओठातून येत नसेल ना?” म्हणजे कोणाच्या? पोलिसांच्या का शेतकऱ्यांच्या?

स्वप्नाः (त्याच्याकडे पहात) वाळलायस रे.

मिलींदः हं! लोकं एकमेकांना अनेक दिवसांनी भेटली की जाड झालायस आणि वाळलायस याच्या पलिकडे कधी बोलणारेत  कुणास ठाऊक!

स्वप्नाः बदल जाणवतो ना बऱ्याच दिवसांनी भेटल्यावर. माझ्यात नाही जाणवते?

मिलींदः तुझं कौतुक ऐकायचंय का तुला? कशी होतीस तू? आणि काय झालीयेस! कुणी जमवलं तुला एवढं टापटिपीत ठेवायला?

स्वप्नाः माझा मीच प्रयत्न केला. जमलं मग आपोआप.

स्वप्नाः ऐ आजचा पेपर आहे का?

मिलींदः न्यूजपेपरच्या ऑफीसमध्ये बसून कोण विचारेल असं? बाकी कोणी नसलं तरी आम्ही वाचतो आमचा पेपर. कोपऱ्यात आहे, तिकडे.

स्वप्नाः (खिन्नपणे हसत) एक लाख खप आहे पुण्यात, माहीतेय मला. ऑल एडिशन्स मिळून सव्वा तीन.

मिलींदः आणि याच दुःख होणारी जगातली पहिली पत्रकार असशील तू!

(स्वप्ना ओशाळून हसते, उठते आणि पेपर उचलते. पेपर चाळायला लागते.)

स्वप्नाः आहे वेळ, तर जुने अंक चाळते जरा! हल्ली पेपर वाचायला वेळच मिळत नाही. (थांबून)

स्वप्नाः ओ के. (तिची पान उलटण्याची एक विशीष्ट पध्दत आहे. मध्ये डोक खुपसून पान उलटतेय. ती नीट वाचायचा प्रयत्न करते. सगळयात शेवटचं पान दुमडते. इकडे तिकडे पहाते, आणि शेजारच्या डेस्कमधून पेन्सिल काढते. शब्दकोडं सोडवायला लागते. यात काही वेळ जातो. ती बघता बघता थोडी अल्लड लहान वागू लागतेय. जणू तिच्यावरचं प्रौढ सिरीयस बाईचं आवरण हळूहळू निघायला लागलंय.)

स्वप्नाः (आपसूकच) हं... सोप्प आहे. (पेन्सिलीने लिहीते. त्याच्याकडे पहाते) दोन आडवं... मर्ढेकरांची एक कविता... भंगू दे काठिन्य माझे... काय कविता होती ना? भंगू दे काठिन्य माझे आम्ल जाऊ दे मनीचे

मिलींदः (हसतो.) येऊ दे वाणीत माझ्या, सूर तुझ्या आवडीचे! येऊ दे बातमीत माझ्या शब्द तुझ्या आवडीचे!

(हसतो. स्वप्ना त्याच्याकडे अपराध्यासारखी पहातेय. तो पहात नाहीये. अचानक तंद्री भंग होते.) तीन उभं... फुलाच्या आधीचा भाग? इ. कळी! बारा आडवं, कुणाला काही कळू नये म्हणून एकमेकांना केलेल्या खाणाखुणा, अळीमिळी गुपचिळी! (खूश होते.) जमलंच! महात्मा फुले यांच्या नावानी असलेलं ठिकाण मंडई! पुण्यात दरवर्षी भरणारा संगीत महोत्सव, सवाई गंधर्व, स्मिता पाटीलचा एक सिनेमा... भूमिका! अरे... नवल आहे! हे सगळंच सोप्प आहे. (तो तिच्याकडे पहातो. ती पहाते दोघांमध्ये एक ऑकवर्ड क्षण जातो. तिला काहीतरी सरकन आठवतं. त्याच्याकडे तेवढयाच पोटतिडकीने पहाते.)

मिलींदः काय झालं गं?

स्वप्नाः (डोळयात किंचीतसं पाणी आणून) मिलींद, तू शब्दकोडी कधीपासून लिहायला लागलास?

मिलींदः (करारी पणे) काय आहे ना, लोक मुली सोडून गेल्या की कविता लिहीतात, मी शब्द कोडं लिहीलं. आणखी काही विचारायचंय?

(ती फक्त मान हलवून नाही म्हणते. डोळयात पाणी आलेलं.)

स्वप्नाः मिलींद एक विचारु? तुला ब्रेक कधी आहे?

मिलींदः (घडयाळात पहातो. ते बंद पडलंय त्यावर मारतो. तिच्याकडे पहातो.)

(रेस्टॉरेंट मधलं गाणं सुरु होतं. अंधार)

**प्रवेश तिसराः शेवटचा.**

(एक जुनं हॉटेल दिसतं. मागे जुनी गाणी चालू आहेत. मिलींद आणि स्वप्ना आत बसलेले. हा बिअर बार कम हॉटेल असावं. थोडंस शेडी. डाऊन मार्केट. खरंतर तिच्यासारख्या मुलीला  ऑकवर्ड व्हावं असा पण ती आरामात सराव असल्यासारखी आलीये. मिलींदच थोडासा बावचळलाय. स्वप्ना बसल्या बसल्या पाय हलवतेय. तो इकडे तिकडे पहातो. समोर बीअर ठेवलेली, संपवतो. स्वप्ना त्याच्याकडे पहातेय. )

स्वप्नाः मला सांगशील का लिहीलं होतसं शब्दकोडं तसं?

मिलींदः मग काय करु मी? माझं लग्न झालंय, बायको आहे मुलगा आहे. अशा वेळी या जुन्या आठवणी सांगायच्या कोणाला? मग लिहीलं शब्द कोडं एक दिवस. मला माहीती होतं की ते आख्ख्या दुनियेत फक्त दोन जणांना सोडवता येण्यासारखं आहे. तुला आणि मला. (समोर घडयाळात पहात) अकरा वीस झालेत. पाउणेबाराला जायला पाहीजे परत.

स्वप्नाः जाऊ रे. (बदलत) जाऊ म्हणजे.

मिलींदः बीअर चांगली भरलीये त्यानी. फेस नाही आजिबात. टेक्नीक आहे ते पण. (इकडे तिकडे पहात)

स्वप्नाः (एकदम) अजून बीअर? मला माहीतेय तुला गरज आहे.

मिलींदः वीस मिनीटं आहेत फक्त.

स्वप्नाः (हात वर करत) अजून एक बीअरला किती वेळ लागतोय! (वेटरला) चिल्ड.

मिलींदः संभाषण बरोबर उलटं सुरु आहे. मी तुला पहिल्यांदा बीअर प्यायला घेऊन गेलो तेव्हा मी म्हणलं होतं बीअर? तू म्हणली होतीस वीस मिनीट आहेत फक्त. मी म्हणलो होतो अजून एका बीअरला किती वेळ लागतोय?

स्वप्नाः तुला अजून काही सांगायचंय?

मिलींदः (हसून) बातमी कापायला लागेल अजून काही केलंस तर. (थांबतो. एक दोन क्षणांनी) स्वप्ना! पाय नको ना हलवूस.

स्वप्नाः सॉरी.

मिलींदः मला वाटलं नव्हतं तू...

(बीअर घेऊन एक जण येतो. थंड बास का विचारतो. दोघं हो म्हणतात. बीअर देतो. मिलींद घेतो.)

मिलींदः तुला?

स्वप्नाः मला ज्यूस. संत्र्याचा. साखर नको.

मिलींदः हाय लेवल हां? चीअर्स. आपल्या परत भेटण्याला. (पहिला घोट घेतो आणि प्रचंड हलकं वाटतं. ती त्याच्याकडे फक्त पहात रहाते.) तुझ्याबददल किती राग होता मनात. (थांबून) म्हणजे अजूनही आहे. पण ज्याच्यावर राग आहे तो माणूस समोर आला की नेमकं कसं वागायचं कळत नाही. त्रेधातिरपीट होते. असो. एवढी मोठी कंपनी आहे पी आर ओ ठेवण्याएवढी!

स्वप्नाः आता तू विषय काढलास.

मिलींदः नाही, सांग ना. कुतूहल म्हणून.

स्वप्नाः कंपनी आत्ता टेकऑफ स्टेजला आहे खरंतर, देशात सात ठिकाणी कन्स्ट्रक्शन चालू आहे आमचं आत्ता. हे सांस्कृतिक केंद्र त्या मानानं छोटं पण महत्वाचं काम होतं. तुला माहीतेय याचं डिझाईन कुणी केलंय? जगप्रसिध्द फ्रेंच आर्किटेक्ट थेपॉं!

मिलींदः आपल्याकडे डिझाईन कुणी केलं याला काडीचंही महत्व नसतं. बांधतय कोण याला महत्व आहे. कारण ती लोक त्यांना हवं तसं डिझाईन करतात. यांना ताजमहाल डिझाईन करुन दिला तरी हे बांधणार त्यांना हवा तसाच. वर शहाजहान ला पटवतील, चार च्या ऐवेजी सहा मिनार कसे गरजेचे आहेत. टॉपला घुमट नको चौकोनच ठेऊ, संगमरवर महाग पडेल, शहाबादी घ्या (हसायला लागतो.)

स्वप्नाः (किंचीत हसत) आमच्या सरांना ॲस्थेटिक सेन्स सॉलिड आहे.

मिलींदः आणि कॉमन सेन्स? सत्तर फूट भिंत पडली हे त्या फ्रेंच आर्कीटेक्टला कळलं तर आयफेल टॉवर वरुन उडी मारेल तो.

स्वप्नाः प्रॉब्लेम भिंत पडली हा नाहीये.

मिलींदः (मोठा घोट घेत.) काय? काय म्हणालीस?

स्वप्नाः नाही म्हणजे ते वाईटच झालं. पण आता मुख्य मुददा असा आहे की कंपनी टेक ऑफ स्टेज ला आहे. इराकमध्ये एका महालाचं काम मिळालय आमच्या कंपनीला मिलींद. पाच कोटी रुपयांचा प्रोजेक्ट आहे. इतर ठिकाणी कन्स्ट्रक्शन चालू आहेत तिथं सुमारे सातशे ते आठशे लोक काम करतायत कमीत कमी. उदया कंपनीचं काही बरं वाईट झालं तर कोलमडणार सगळं. कुठे जाणार ना ही गरीब बिचारी लोक. त्यांचीही अर्थ व्यवस्था कंपनीवर अवलंबून आहे नाही  का?

मिलींदः मला माहीतीये आमचा पेपर आणि त्यातली माझी बातमी ही एवढी क्रांती आणणार नाही! झाडावर चढवू नको.

स्वप्नाः तसं नाही, लेट मी एक्सप्लेन. उदया एक बातमी आली, पुढच्या आठवडयात तीन ठिकाणी प्रेझेंटेशन्स आहेत. तिथं राजकारणी ब्यूरोक्रॅटस असणार, ते प्रश्न विचारणार, क्रेडीबीलीटी बददल शंका घेणार आाणि त्यातून अडचणी वाढणार. मग ते नाक फुगवणार, कंपनी हाजी हाजी करणार, मग ते कमीशन पर्सेंटेज वाढवणार, आमचे हात उगाचच दगडाखाली येणार.

मिलींदः लोकांचे जीव भिंतीखाली आले तर चालतात, तुमचे हातही दगडा खाली येऊ नये म्हणून एवढा आटापिटा? राहू दे.

स्वप्नाः कंपनीचं नाव, प्रेस्टीज असं सगळं तुझ्या बातमी पाशी आहे. प्रश्न फक्त तीन ओळींचा आहे.

मिलींदः तीन जिवांचा नाहीये? तुझ्या अ‍ॅस्थेटिकसाहेबांना म्हणाव हात काढून दया. नाही छापत तीन ओळी. किंवा चला एक बोट काढून दया.

स्वप्नाः काहीही बोलतोयस तू! असं कुठे असतं का?

मिलींदः हां मग. त्यांचे जीव गेले ना.

स्वप्नाः पण कॉम्पेनसेशन दिलंय ना त्यांना आम्ही. आमचे मॅनेजिंग डायरेक्टर. ज्या सहा झोपडया होत्या त्या सगळयांना तिथल्या तिथ जाऊन भेटून कॅश कॉम्पेन्सेशन दिलंय त्यांनी.

मिलींदः किती गं?

स्वप्नाः आमचे वर्कर होते त्यांना तीन तीन हजार. टेम्परारी होते पण तरी तीन हजार. आणि बाकीच्यांशी काही संबंध नव्हता तरी पाच पाच शे रुपये तिथल्या तिथं.

मिलींदः पाचशे रुपये? बास?

स्वप्नाः आम्ही एवढंच करु शकतो. तुला माहीतीये. बोलू नये पण जे बाळ गेलं ते गेली अनेक महिने आजारीच होतं असं आमचे एम डी म्हणाले. आणि जे जखमी झाले त्यातली दोन माणसं पैसे मिळताच समोर हातभटटीवर गेली. आता बोल.

मिलींदः म्हणून त्यांचा जीव पाचशेचा. ते हात भटटी पितात, म्हणून ते पाचशे, मी बिअर पितो माझा किती?

स्वप्नाः मला माहीतेय तू पैसे घेत नाहीस. छापायचेही नाही आणि दाबायचेही नाही.

मिलींदः बातमी दाबणं वगैरे बोलायला लागलीस?

स्वप्नाः बोलावं लागतं. कामच तसं आहे माझं. आणि नाही बोललं तर काम होत नाही. घेतलाय अनुभव आज.

मिलींदः बरं. काय देऊ शकता तुम्ही एक बातमी दाबायचे? म्हणजे काय रेट चालू आहे सध्या? एक आपला बाजारभाव?

(अचानक शांतता जाते.)

स्वप्नाः तू खरंच विचारतोयस?

मिलींदः हो, सांग तर.

स्वप्नाः पाच पर्यंत! पेपर मोठा असेल तर, दहा.

मिलींदः म्हणजे तीन माणसांची किंमत नऊ हजार, आणि तीन वाक्यांची दहा! कमाल आहे.

(ती ओशाळते. शांतता जाते. मिलींद एकटक बिअर कडे पहात राहीलाय)

मिलींदः कमाल आहे. बीअर. परवाच याची जाहिरात पाहीली मी कुठतंरी. हलकं करणारा तजेलदार अनुभव. तजेलदार वगैरे माहीत नाही, बिअर पिऊन हलकं वाटतंच! (थांबून) मला सांग. तुझा नवरा, जाहिराती करतो म्हणालीस ना मघाशी? कसल्या करतो?

स्वप्नाः कुकर, सॉफ्ट ड्रिंक, बिस्कीटं. चेरी ब्लॉसमचा लोगो त्याने केलाय.

मिलींदः पैसा आहे? (थांबून) असणारच. पैसा सगळयात असतो म्हणा. आपण कमावण्यावर आहे. आता पण बघ ना मी बसल्या बसल्या दहा कमवू शकतो. (हसायला लागतो.)

स्वप्नाः सोड ना, मला बऱ्याच वेळेला वाटलं... तू खूप छान जाहीराती केल्या असत्यास. तुला टायटल्स, वन लायनर्स फार मस्त सुचायची.

मिलींदः सुचतात. अजूनही सुचतात. पण जाहीराती म्हणजे खोटेपणा. पालीची सुसर आणि बदकाचा राजहंस करुन दाखवायचा. आत्ताच एवढं आहे, अजून दहा वीस वर्षांनी काय बघायलाच नको. पेपरात जाहीराती नाही, जाहीरातीत पेपर असणार. तो दिवस दूर नाही की फ्रंट पेजवर पण जाहीराती जास्त बातम्या कमी असतील. मास्टहेड ची जागा ही विकायला निघेल. लिलावासारख्या बोली निघतील. दैनिक हिंदुस्थानच्या जागी, लंडन पिल्सनर, जुनेजा टायर्स, गोल्डमन बिस्कीटस, माक्याचे संतराम तेल, सगळीकडे नुसत्या जाहीरातीच जाहीराती. छोटया, मध्यम, मोठया, आत, बाहेर, वर, खाली. सगळीकडे. तुला सांगतो जाहीराती म्हणजे मनापासनं बातमीदारी करणाऱ्यांच्या खऱ्या बातम्यांची थडगी. (थांबून) आणि काय गं आता, बातम्याही जाहीरातीच असतात की... मला तर तशाच दिसायला लागल्यात गेल्या काही दिवसांपासनं. पंतप्रधानानी रेल्वेचं उदघाटन केलं त्यांची जाहीरात. मुख्यमंत्र्यावर विरोधी पक्षानं ठराव आणला, त्यांची जाहीरात. नाटक सिनेमाचं परिक्षण आलं, त्याची जाहीरात, नेवळेकरांची पुतणी बोर्डात आली तिची जाहीरात. सगळया जाहीरातीच. कंटाळलो मी त्यालाच. (थांबूनच) स्वप्ना, तुला माहीतेय, आज राजीनामा देणार होतो मी.

(अचानक शांतता पसरते.)

मिलींदः ठरवूनच निघालो होतो घरुन. हॉस्पिटलमध्ये बसून एकटाकी लिहून काढला.

स्वप्नाः तू खरं सांगतोयस?

मिलींदः हो. भांडण झालं कालच. खूप मोठठं. म्हणून आलो आजपासनं रात्रपाळीला. (थांबून) हे तुला मी हयासाठी सांगत नाहीये हां, की तू मला भेटलीस, आणि बसवून बीअर पाजलीस.

स्वप्नाः माहीतेय मला. का रे पण एकदम राजीनामा?

(एकजण ज्यूस घेऊन येतो.)

मिलींदः मी दिलेल्या बातमीत परस्पर फेरफार करुन दोन नावं घुसवली ठाकूरांनी. फोटोही काढून टाकला. एक जाहीरात आली मोठी. मग काय? बातमीची जागा कंपोझिटींगला जाताना नेमकी बदलली. आणि हे पहिल्यांदा झालं नाहीये. दरवेळेला होतं. बातमी बदलते, जागा बदलते, मजकूर बदलतो, कधी कधी मुददाम माझी बायलाईन देत नाहीत. (हताश होऊन) हरामखोर आहेत साले. साडे दहा वर्ष काम करतोय. करतोय की नाही? (हळूहळू भावूक हलका होत जातो.) मनापासून, तत्वबित्व बाळगून, करप्ट न होता. म्हणून तिथंच आहे बघ! आजूबाजूचे सगळे मी आणि त्या जागेनी असे डोळयासमोर जाताना पाहीलेत. (रोखून) तुझ्यासकट. कुणी जागतेनं गेलं, कुणी मनातनं. मी राहीलो तसाच. कागदाच्या ढिगाऱ्यात, एकवर फिरणाऱ्या फॅनखाली, चहावर चहा पित. उंदीर, ढेकूण मारायच्या औषधाच्या वासात. सगळे पाहीले मी. पैशाचं पाकीट, भरलेला ग्लास आणि चिवडयाची प्लेट मिळाली की नाटक सिनेमाचं परिक्षण चांगलं लिहीणारे, साध्या नगरसेवकानीही खांदयावर हात ठेवला की त्यांचा फोटो डबल साईज करणारे, वरनं फोन आला की गुळचटासारखं हो हो सर करत सगळं बदलणारे किती जण पाहीलेत. नोकरी करणारी माणसं करप्ट का होत जातात याचं उत्तर मला मिळालंय. स्वप्ना ते कधीच करप्ट होत नाहीत, त्यांना त्यांची किंमत कळायला लागते. आणि इतरांना आपली किंमत आहे हे लक्षात आलं की त्यात प्रचंड समाधान मिळतं, पैसा मिळतो, प्रतिष्ठा मिळते. एकमेकांविषयी आदर वाढतो. माणसांची प्रस्थ होतात. कुणी गाडया घेतात. कुणाची घरं होतात, कुणी आणखी काही मिळवतं आणि या सगळयात, जो एकाही पैशाची, एकाही क्षणाची, एकाही शब्दाची लाचारी स्वीकारत नाही तो मागास. तो भेंचोद तसाच रहाणार. (थांबून) मी फार टोकाचं बोलतोय ना?

स्वप्नाः पण खरं बोलतोयस.

मिलींदः आयुष्यभर आपण ज्या गोष्टीसाठी झटलो त्यामुळेच आपण मागे पडलो ही भावना किती विचित्र आहे नाही. तुला माहीतेय, ए तुला वेळ आहे ना थोडा माझ्यासाठी?

स्वप्नाः बोल ना, आहे. तुलाच नाहीये.

मिलींदः आहे. दहा मिनिटं हक्काची आणि पाच मिनिटं एक्स्ट्रा आहेत माझ्याकडे. आणि तसंही मी सोडणारच आहे नोकरी. काही नाही गं. आत्ता दोन वर्षापूर्वीची गोष्ट आहे... दीडशे रुपयांनी पगार वाढला म्हणून इतका खूश झालो होतो एक दिवस. म्हणलं आता जरा चैन करुया. पावसाळी हवा होती. रिक्षाची वाट पहात उभा राहीलो. त्यात पुण्यातले रिक्षावाले. डेक्कनच्या पुढे डायरेक्ट मध्यप्रदेश सुरु होतो असं वाटतं त्यांना. त्यामुळे तयारच होईनात.

(दोघं हसतात.)

मिलींदः तर, मी वाट पहात उभा, वरनं विजा कडकडतायत आणि समोरुन एक कोरी करकरीत प्रिमियर पदमिनी आली आणि आतून मिल्या अशी हाक आली. डोकावून बघीतलं तर सातपुते होता.

स्वप्नाः विकास?

मिलींदः हो. आठवतंय त्याला मी पहिल्या दिवशी आला तेव्हा सांगितलं होतं, बातमी म्हणजे काय? बात आणि मी चं समीकरणं. अपघातात जेवढे जास्त मृत तेवढी मोठी बातमी! बेसिक बेसिक शिकवलं होतं. मान वर करुन पहायचा नाही ऑफीसमध्ये. त्यानं सहा वर्षांनी भर रस्त्यात मिल्या अशी हाक मारली मला. मला म्हणाला ओ उपसंपादक, चला सोडतो. बसणार नव्हतो पण म्हणलं बघावं, कसं वाटतं चार चाकीत बसून. बसलो. सांगत होता नोकरी सोडल्यावर कशी प्रगती केली. मंत्रालयात लागलं कनेक्शन आणि गाडी जी सुटली ती थेट प्रिमीयर पदमिनीच! (मान हलवत) थक्क झालो ऐकून. मला म्हणाला काय चाललंय बाकी? मी सांगणार होतो आजच दीडशे रुपयानी पगार वाढला तेवढयात तोच म्हणाला, मी पण लिहायचो रे काय काय तुझ्यासारखं! उगाच वेळ घालवायचो हे आर्टीकल लिहू म्हणजे लोकांना आवडेल, ही बातमी करु म्हणजे समाज बदलेल, मग मला लक्षात आलं 'व्ही लीव्ह इन अ वर्ल्ड व्हेअर को ऑर्डिनेटर्स हॅव मोर रिस्पेक्ट ॲण्ड मनी दॅन क्रिएटर्स'. सोडली बातमीदारी, लायझनिंगमध्ये मारली उडी! शिवाय बाकीच्या गोष्टी करतो. सत्तर पंच्याहत्तर हजाराचं सेव्हींग झालं सहा वर्षात. सत्तर हजार! टेलिफोन नंबरही दिला मला. म्हणाला काही काम असेल तर सांग. तू शिकवलयंस मला. तुझ्यासाठी स्पेशल रेट! डिस्काऊंट! (थांबतो. दीर्घ श्वास घेतो.) ते वाक्य जाम लागलं मला, म्हणलं मी उतरतो. त्याला सोडला, स्वतःच्या विचारातचं चालायला लागलो आणि अचानक जोरदार पाऊस सुरु झालं. काय गम्मत आहे, तो गाडी असूनही जोरात निघून गेला आणि मी काही नसूनही शांत चालत राहीलो. त्या विचारात भिजत गेलो. अगदी त्या वाढलेल्या पगाराच्या दीडशे रुपयाच्या नोटांसकट. त्याच नोटा रात्री तव्यावर भाजताना मला वाटलं की आज ज्या वेगानं मला उतरवून तो पुढे निघून गेला, त्याच वेगानं जग पुढे निघून गेलंय, आणि आपण तव्यावर आपल्या फुटकळ आनंदाची उब घेत बसलोय.

स्वप्नाः पण तुला रात्री झोप तरी लागत असेल शांत.

मिलींदः गप गं. फार भाबडं आणि मूर्ख पोएटिक विधान आहे हे. करप्ट न झालेल्यांना रात्री झोप लागते. हिंदी पिक्चरमध्ये बच्चन किंवा अनिल कपूरच्या आईनी म्हणलं तर ठीक आहे, आपण म्हणजे आम्ही, कोण आहोत गं? माणसं. साधी. टेबल फॅनचा वारा पुरत नाही आमच्या खोल्यात, अंघोळीचं पाणी पातेल्यात तापवतो... आम्ही. यांच्या सारखं नाही कधीही उठलं की आपलं बेटा मेने तेरे लिये गाजर का हलवा बनाया है. काय गाजराची शेती आहे घरी? का तुपाची फॅक्टरी?

स्वप्नाः मला विचारशील तर नको सोडूस नोकरी. तुझ्यावर घर अवलंबून आहे. जबाबदारी आहे.

मिलींदः आपल्यावर घर अवलंबून असणं हा शाप वाटतो मला आता, जबाबदारी नाही. कोण विचार करतं माझ्यासारख्यांचा? पैसे कमवा, घरी दया. बायको मुल सांभाळा, मोठयांच औषध पाणी करा, सण समारंभ करा आणि आतल्या आत फुटत रहा. घर ऑफीस शाळा हॉस्पीटल देऊळ या पाच सात वर्ष गेली माझी. तळजाईच्या टेकडी वर तुला मिठीत घेऊन हॉवर्ड रोआर्क समजून उभा रहाणारा मी आज दहा वर्ष झाली शनिवार वाडा सुध्दा आतून पाहू शकलो नाहीये! घेरी येईल माझं आणि बायकोचं रुटीन ऐकून. मी दुपारी दोन ते नऊ हॉस्पीटल मध्ये. ती रात्री नऊ ते सकाळी सात. त्यात मुलाचं बघणं, स्वयपाक, आवरावआवरी, परत दवाखाना. कसं सुचणार यात बाकीचं सगळं? तीनं दमून अंग टाकलं ना, की अशी गाढ झोपते की तिच्या डोक्यावरनं हात फिरवायची पण इच्छा होत नाही. बिचारीला जाग यायची, नको. त्यात हे ऑफीस असं. तुला सांगतो

खितपत पडल्यासारखं झालंय. दहा वर्ष तेच ऑफीस, तीच जागा, तेच टेबल. (किंचीत हसत) तू ही नाहीस त्यात. नाहीतर ढकललेही असते दिवस. मिनू, तुझी आठवण आली की मी काय करतो माहीतेय?

स्वप्नाः (लगबगीने गटागट ज्यूस प्यायला लागते) हं.

मिलींदः मी पुलापाशी जाऊन थांबतो कधीतरी दोन मिनीट. शेजारी तू असल्यासारखा गटागट उसाच्या रसाचा ग्लास संपवतो. (ती तेव्हाच ठापकन ग्लास ठेवते. दोघं एकमेकांकडे पहातात.) मी रुमालाला मुददाम शाई पुसतो. कसेटमधनं मुददाम रीळ ओढून बाहेर काढतो. ऑफीसला असेन तर मी खाली लायब्ररीत जातो, आणि पुस्तकातली डबल दुमडलेली पानं शोधतो. (थांबून) बाकी सगळं ठीके पण तुझं खांदयावर रेलणं मिस करतो मी जाम मिनू. (शांतता जाते. एकदम बदलून) हीच ती वेळ! निघूया?

स्वप्नाः हं.

(स्वप्ना उठते. त्याच्या शेजारी जाते. त्याच्याकडे पहाते आणि त्याच्या खांदयावर हात ठेवते. तो चमकतो. तिच्याकडे पहात रहातो.)

स्वप्नाः तुला काही मदत हवी असेल मला सांग. हक्काने. प्लीज.

मिलींदः त्या पेक्षा नोकरी सोडीन मी.

स्वप्नाः ऐक, नको सोडूस.

मिलींदः सोडली नाही तर बातमी येणार. अगदी त्या तीन वाक्यांसकट.

स्वप्नाः येऊ दे.

मिलींदः उगाच तुमच्यासारख्या लोकांचा प्रॉब्लेम व्हायचा.

स्वप्नाः माझं काय व्हायचं ते होऊ दे पण आता हे सगळं ऐकल्यावर मला तुला हरलेलं पहायचं नाहीये. त्या सगळयांमध्ये तुझ्यासारखा एक आहे, म्हणून तर त्या फोटोतल्या जिवंत मुलीला आशा आहे मिलींद. अर्थात, मला त्या तीन ओळींची किंमत किती जास्त आहे, हे मला तुला समजावता आलं असतं, तर आणखी काय हवं होतं? चल जाऊया. (पर्समधून पैसे ठेवते. आणि मिलींद उठतो.)

मिलींदः म्हणजे? मला नाही कळालं?

स्वप्नाः अरे काही नाही! चल!

मिलींदः काही सिरीयस नाही ना?

स्वप्नाः मिलींद, अरे प्रोबेशन वर आहे मी आणि उदया बातमीतली ती तीन वाक्य मी थांबवली तर आणि तरच माझी नोकरी परमनंट होणारे.  (मिलींद थिजल्यागत तिच्याकडे पहात उभा आहे.)

स्वप्नाः आणि कसं आहे रे, दुर्दैवानं माझंही घर माझ्यावरच अवलंबून आहे!

(त्याच्या पाठीवर थाप मारते. मिलींद पूर्णपणे विचारात. ती लांब जाऊन थांबते. त्याच्याकडे पाहून तुटक हसते.)

स्वप्नाः ज्या माणसाला आपण भूतकाळात सोडलं होतं, त्याच्याच हातात आपला भविष्यकाळ असणं हयाच्यासारखं घाबरवणार दुसरं काहीही नाही बघ. (त्याच्याकडे पहाते. गळा भरुन येतो. अचानक हुंदके दयायला लागते, मिलींद तिचं सांत्वन करायला तिच्या जवळ जातो, तिचा हात हातात घेतो. दोघं एकमेकांकडे पहातायत. मिलींद तिला धीर देतो)

स्वप्नाः (अत्यंत आशेने) मिलींद बघ ना असं काहीतरी व्हायला हवं की तुलाही कॉम्प्रमाईज करावं लागणार नाही आणि मलाही मॅनेज करावं लागणार नाही. मिलींद प्लीज!

(मिलींद कोपऱ्यात अडकलाय स्वप्ना त्याच्याकडे आशेने पहातेय. मागून सवाई गंधर्व मधल्या गाण्याची सुरावट ऐकू येते.)

**मध्यंतर**

**अंक दुसरा**

**प्रवेश पहिला**

(रस्त्याचा एक पटटा दिसतो. शेजारी एक जुनी पत्रपेटी. मागे भिंत. त्यावर एक होर्डिंग इंडीया बिल्डर्सचं. शेजारी पोस्टर्स डकवलेली. कामगारांच्या सायकली लागलेल्या. पेपरच्या ऑफीसला जायचा जिना. लांबून कुठूनतरी शेकोटीचा धूर यावा. दोघे मुन्सिपालीटीच्या दिव्याखाली उभे आहेत. तिने त्याचा स्वेटर घातलेला.)

मिलींदः (थंडी अनुभवत) नेवळेकर उगाच गेले नाही शिमल्याला?!

स्वप्नाः मघाशी इतक्या घाईने चल म्हणालास, मला वाटलं...

मिलींदः काय वाटलं? मी बातमी बदलेन?

स्वप्नाः नाही नाही. माझी गरज आणि तुझं तत्व यात नेहमीच तुझं तत्व महत्वाचं होतं आणि आहे.

मिलींदः वर येतीयेस?

स्वप्नाः नाही. मी निघते.

मिलींदः मग थोडा वेळ थांबू खालीच. वर गेलं की मला गुदमरल्यासारखं होतं. तसंही काहीच बोलली नाहीयेस तू रस्ताभर.

स्वप्नाः मला माझ्या दुःखाचं भांडवलं करुन काम करुन घ्यायचं नाहीये.

मिलींदः काम तसंही होणार नाहीये.

स्वप्नाः रिक्षा कुठे मिळेल जवळपास?

मिलींदः सांगून किमान हलकं तरी वाटलं असतं. म्हणजे बघ!

स्वप्नाः नको रे. राहू दे. इतक्या वर्षांनी आपण असे भेटलोय तेही असे गाळात रुतल्यासारखे. त्यातनं बाहेर येता येणार नाहीये मग कशाला उगाच आरडाओरडा. झटापट. आणि जवळच्या माणसांना सांगीतल्यावर आपलं दुःख कमी होतं, पण त्यांची काळजी वाढते ना उगाचच! असो आपण भेटलो या निमित्तानी तेवढं एक बरं झालं.

मिलींदः आपण भेटण्यासाठी तीन जणांना जीव घालवायला लागले. वाईट आहे पण खरं आहे. (ती ओशाळते. तो मागे भिंतीवरची पोस्टर्स पहात) हा अनिल कपूर चांगला आहे हां! मिशी बिशी झुपकेदार! आणि ही माधुरी दिक्षीत पण जाम आवडेतय सध्या सगळयांना. तेजाब पाहीला मी मध्ये. अनेक वर्षांनी मॉर्निंग शो ला गेलो होतो. इंटरवल मध्ये बाटल्यांवर ओपनर वाजण्याचा आवाज ऐकला आणि सरकन तुझी आठवण आली. (थांबतो.) अगं, इंगळे पाहून आला होता आणि ऑफीसभर सांगितलं की त्यातला लोटीया पठाण आहे तो सेम टू सेम नेवळेकरांसारखा दिसतो. हे बघ हा, याला जरा चष्मा लावला आणि केस थोडे पांढरे केले की नेवळेकरच!

लगेच आख्ख्या ऑफीसनं तिकीटं काढली. नेवळेकरांसमोर जायचाच नाही कुणी पुढचे चार दिवस! (हसतो.) तू बघतेस का नाही सिनेमे वगैरे?

स्वप्नाः वेळच मिळत नाही.

मिलींदः (दुजोरा देत) वेळच मिळत नाही!

स्वप्नाः मनापासनं इच्छाच होत नाही सिनेमाला जायची.

मिलींदः का गं? स्मिता पाटील नसते म्हणून.

स्वप्नाः तू काय मला रडवायचं ठरवलंयस? (एकदम) गेलीच रे ती.

मिलींदः दोनदा पाहीला होता ना आपण भूमिका?

स्वप्नाः चार वेळा. (खिन्नपणे हसते.) ऐकदा आयुष्यात भेटायचं होतं, कित्ती पत्र लिहीली होती मी. अर्थात पाठवली नाहीत कधी. (त्याच्याकडे पहात) काय काय करायचो ना आपण वेडयासारखं. गच्चीत लपून छपून भेटणं काय, मी तुझ्या घरी कोणी नसताना तुझे कपडे घालून बघणं काय, मी तुला स्मिता पाटील आणि तू मला सुनील गावस्कर नावानी पत्र लिहीणं काय!

मिलींदः हो. आठवतंय.

स्वप्नाः आईनी धरलं होतं एकदा पत्र वाचताना, खाली नाव वाचलं सुनील गावसकर आणि चक्करच यायची राहीली होती तिला. आपल्या मुलीला सुनील गावसकरनी प्रेमपत्र लिहीलंय हे कळल्यावर कोणाची आई वेडी होणार नाही. नंतर एकदा तू घरी येऊन गेलास, तेव्हा धनूनी हळूच विचारलं, काय? सुनील गावसकर का?

मिलींदः योग्य वेळी रिटायर झाला तो. काय काय झालं ना आपण वेगळे झाल्यावर? बेल बॉटम गेल्या, जीन पँट आल्या, वाडे जाऊन इमारती यायला लागल्या, रंगीत टीव्ही आले, परवा मुलगा हटट करत होता, आतमध्ये लाईटींगचे बूट पाहीजेत म्हणून. आपल्या त्या वेळेच्या प्रेमाचे, आणि त्या वेळेच्या पुण्याचे फक्त अवशेष शिल्लक आहेत आता.

स्वप्नाः पत्र लिहायचं प्रमाणही कमी झालं आता.

मिलींदः छे! रोजची दोन अडीचशे पत्र असतात वाचकांचा पत्रव्यवहारात. विविध विषयांवरची. छायागीतची वेळ वाढवा पासून दूरदर्शनवर क्रिकेट दाखवणं बंद करा इथपर्यंत! परवा एक चार पानी पत्र आलं होतं सददाम हुसेन कडे भारतानं वेळीच लक्ष दयावं! सापाला दूध पाजू नये! बी बी रिसबूड सहकार नगर.

स्वप्नाः (हसते.) मॅड असतात लोकं. आता रिसबूडांनी दैनिक हिंदुस्थान ला पत्र लिहून सददाम कडे लक्ष दिलं जाणारे का?

मिलींदः पण तरी लिहीतात लोकं ते महत्वाचं.

स्वप्नाः गप रे. तू एकदम त्यांची बाजू घेऊ नकोस.

मिलींदः लोकांना आजूबाजूच्या गोष्टींविषयी काहीतरी वाटतंय हे कमी महत्वाचं आहे का? ज्या दिवशी हे वाटणं ज्या दिवशी बंद होईल ना त्या दिवशी प्रॉब्लेम सुरु होईल. अजूनही विचारांना महत्व आणि शब्दाला किंमत देणारी माणसं शिल्लक आहेत. काही तर ठरलेली लोक आहेत, ऑफीसला येऊन सांगतात हे चुकीचं आहे, हे चांगलं केलंत, बातमीत ही भाषा वापरलीत तर जोडयानी मारतील वगैरे वगैरे! अशी लोक असतात म्हणून तर पेपर चालू आहेत अगं.

स्वप्नाः आता हे भाबडं आणि पोएटिक विधान नाही का? पेपर जाहीरातीवर चालतात. सगळयांना माहीतेय. पन्नास पैशाला दहा पानांचा पेपर कसा परवडतो? तुमच्या हिंदुस्थानचे जाहीरात विभागाची लोकं आत्ता मागच्या महिन्यात दोनदा चक्कर मारुन गेले. जाहीरात दया, जाहीरात दया. क्वार्टर पेज जाहीरातीवर सहा छोटया जाहीराती फ्री! (थांबून) घ्यायला पाहीजे होतं ते पॅकेज.

मिलींदः तुला काय वाटतं ते केलं असतं तर मी काढलं असतं नाव?

स्वप्नाः कदाचित तुझ्यापर्यंत आलंही नसतं. तुझ्या पेपरातल्या किती गोष्टी तुझ्याही नकळत होत असतील की? कोणाला कळतंही नाही अरे आजकाल.

मिलींदः अक्षरला शाळेत सोडायला जातो ना मी एम एटीवर. सकाळी आठला मी सिग्नला उभा असतो. फार गर्दी नसते त्यामुळे बरीचशी लोकं सिग्नल तोडून सर्रास जातात. राग येतो मला. मग विचार करतो. त्यांना मी अडवू शकणारे का? नाही. माझ्या हातात आहे मी लाल दिवा असेपर्यंत थांबण. मी थांबणार. माझ्या हातात काय आहे? बातमी छापणं. मी छापणार.

स्वप्नाः व्वा! चला, मी निघते आता.

मिलींदः का गं?

स्वप्नाः हां, तसंही काम होणार नाहीये. तर मग मी नाही थांबत उगाचच.

मिलींदः मला वाटलं तुला माझ्याशी गप्पा मारुन बरं वाटत असेल.

स्वप्नाः काय आहे, परत एकदा रस्त्यावर गप्पा मारत बसू आणि पहाट कधी होईल कळणार नाही. आणि तुझी बातमी दयायची राहील.

मिलींदः (हसायला लागतो.) बीअर बददल थँक यू. हां आणि जर्कीन नंतर दिलंस तरी चालेल.

स्वप्नाः नाही नाही ठेव तुझ्याकडे. (त्याला बॅगेतनं जर्कीन काढून देते.)

मिलींदः अंग राहू दे.

स्वप्नाः दहा मिनिटात पोचेन रे.  (त्याला जर्कीन देते.) काळजी घे. आणि घरी ये कधीतरी, बायको मुलाला घेऊन.

मिलींदः चॅक!  (थांबून) जाशील ना नीट?

(ती पण त्याला बाय करुन चालत चालत निघून जाते. मिलींद ने हातात जर्कीन तसंच धरलंय. त्याच्यावर हात फिरवून शांतपणे अंगावर घालतो. वर ऑफीसकडे पहातो. जिन्याने वर जातो. दोन क्षणांनी पुन्हा खाली येतो. ती नीट गेलीये ना त्याकडे पहातो. त्याला रिक्षा लांब जाण्याचा आवाज येतो. तो पहात रहातो. वरुन उमेश भोसले येतो. मिलींद त्याकडे दचकून पहातो.)

उमेशः सर, अहो कुठं गेला होतात? मी वाट पहात होतो वर. पंधरा मिनिटं झाली येऊन.

मिलींदः (हसत) नाही नाही, मी वेगळया कामासाठी गेलो होतो.  कागदपत्र?

उमेशः आणलीत ना. काळे जरा डलहौसी निघाले. म्हणून वेळ लागला. सर, यातली माहीती उदयाचा बातमीत आली ना, ढंढाळे लागणार त्या इंडीया बिल्डर्स वाल्यांना!  मी काय म्हणतो दोन पानी पुरवणीच काढायची का यांच्यावर?

मिलींदः (हसून) चल देऊन टाकू बातमी.

(दोघं वर जातात. अंधार)

**प्रवेश दुसराः**

(उमेश बसला आहे. मिलींद कागदपत्रांकडे पहातो.)

उमेशः ओके आहेत ना?

मिलींदः हो! (त्याच्याकडे पहात) हात गारठले ना सायकलवर जाऊन?

उमेशः लक्षच नाही गेलं सर हातांकडं. एकशे वीसच्या स्पीड नी गेलो आणि दोनशे चाळीस च्या स्पीड नी परत आलो. काळयांना शोधायला वेळ लागला, म्हणून वेळ गेला. वरती झेरॉक्स आहे, खाली ओरिजीनल.

मिलींदः झेरॉक्स का काढली? आणि आत्ता कुठं मिळाली?

उमेशः दुकानं किती पण बंद असली तरी आपल्याला चालू करता येतात. झेरॉक्स अशासाठी की समजा एवढी महत्वाची कागदपत्र गहाळ झाली असती तर, काय इज्जत राहीली असती बातमीदार म्हणून? त्यात मला दोन सेटची सवयच आहे. बोर्डाच्या मेन पेपरला पेनाचे दोन सेट, नोकरीला जाताना सर्टेफिकीटचे दोन सेट, पुण्याला येताना कपडयांचे दोन सेट. (थांबून) म्हणजे दोनच आहेत. (त्याकडे पहात) फार म्हणजे फारच पैशे खाल्लेत हो. जाळताना लाकडांच्या ऐवेजी काय नोटा लावणार का हे?

मिलींदः जेवलायस का काही?

उमेशः (त्याच्याकडे पहातो.) भुकेचं सुचतच नाहीये सर, पहिली बातमी येणार ना आपली!  आता मी इथनं रात्रशाळेत जाणार, पोरांबरोबर गप्पा ठोकत बसणार. चार वाजता उठणार आणि डेक्कनला जाऊन पेपर उचलणार ताजा ताजा. इस्त्री मारलेला.

मिलींदः इस्त्री मारलेला?

उमेशः पोरांची भाषा. कुठलीही गोष्ट नवीन असेल तर त्याला इस्त्री मारलेला म्हणतात ते. इस्त्री मारलेलं पुस्तक, इस्त्री मारलेली गाडी, इस्त्री मारलेली घरं, इस्त्री मारलेली पोरगी. (हसतो.) थोडक्यात बातमी वाचूनच आपलं पोटं भरणाराय सर. अजून काय आहे का सांगा?

मिलींदः काही नाही, झाला तेवढा उपक्रम पुरे झाला. याच बरोबर आजचं काम संपलं. धन्यवाद.

(तेवढयात दोन जण डमी घेऊन येतात.)

१ः सर, तीन आणि आठचा ले आउट

(टेबलावर ठेवतात. उमेश लगबगीने मिलींदच्या मागे जातो. डोकावून पहायला लागतो. मिलींद त्याच्याकडे पहातो.)

मिलींदः हे बघ, ही बातमी आहे ना, ही इथं लावं, हयाच्या फोटोची काही गरज नाही. महिन्याला तीनदा येतो याचा फोटो. काढून टाक. शहर मध्ये ही बातमी लावा. याला बॉक्स टाका. भविष्य आलं का?

१ः बर्वे रजेवर आहेत!

मिलींदः कोणी लिहीलं मग? तुम्हीच का?

२ः हो सर.

उमेशः आयला, म्हणजे कुणीही भविष्य लिहीतं? (कपाळावर मारतो.) उगाच राव रोज सकाळ सकाळ बघायचो. सर अहो कराग्रे वसतेच्या आधी हिंदुस्थानचं भविष्य वाचायचो मी.

मिलींदः (हसत) तूही लिहू शकतोस. आपलं भविष्य आपल्या हातात. (त्या दोघांना) तिसरं लावायला घ्या.

उमेशः आपली बातमी कुठल्या पानावर येणार सर?

मिलींदः पहिल्या.

उमेशः (विश्वास न बसल्यासारखा) च्यायला नोकरी मागायला आलो आणि फ्रंट पेजला बातमी लावून घरी चाललो.

मिलींदः (हसतो. त्या दोघांना) मी प्रदेश कमिटीच्या मिटींगसाठी थांबलोय. बाकी पानं क्लिअर आहेत. पहिल्या पानाचं मी बघतो. (टेलीप्रींटर कडे पहातो. दोघं निघून जायला निघणार तेवढयात दार उघडून स्वप्ना पुन्हा आत येते. दोघे तिच्याकडे पहातात. मिलींद तिच्याकडे पहातो आणि चरकतो. बाकीचे दोघे निघून जातात.)

स्वप्नाः मिलींद...

उमेशः (मिलींद) सर तुमच्या मिसेस? नमस्कार मी उमेश भोसले.

मिलींदः उमेश. थांब जरा.

उमेशः बरं. थांबतो.

मिलींदः नाही. म्हणजे जा तू. बास झालं, पहिल्या दिवशीचं काम.

उमेशः सर! तुम्हाला सांगायचंच राहीलं, येताना त्या बिल्डरचं ऑफीस लागलं, इंडीया बिल्डर्स, ब्रेक मारला. समोरनं जाताना दोन शिव्या हासडल्या. (स्वप्नाला) तुम्हाला सांगतो सातार्‍यात असं काय झालं असतं ना, आत घुसु घुसु मारला असता. पुण्यात काय, मूक मोर्चा बिर्चा काढतील दोन दिवसांनी. माझी तर इच्छा आहे, उदया पहीला पेपर त्या बिल्डरच्या घरी जायला पायजे. हे असे कच्च्या मालाची कागदं पेपरात आलेली पाहीली तर ढंढाळेच लागतील त्याला. (स्वप्ना चमकते.) असो, चला मी येतो आता. पोरांच्या इथं जाऊन भाव खातो थोडा. (हसतो. पुढे येतो. खिशातनं एक पेन काढतो.)

उमेशः सर, माझ्याकडून, सप्रेम भेट.

मिलींदः का रे बाबा?

उमेशः उदया एखादी तरी बातमी यानी लिहा सर... पेनाचं सोनं होईल आपल्या!

(मिलींद तो पेन ठेऊन घेतो. त्याला स्वप्ना ने आणलेला पेन देतो.)

मिलींदः हा माझ्याकडून, (स्वप्ना अवाक होऊन पहाते.) जा! चार रंगाचा आहे, लाल काळा निळा हिरवा, शिवाय शाई सांडण्याची भिती नाही.

उमेशः (भारावून) सर पेन कसा आहे महत्वाचं नाहीये, त्यानं काय लिहील जाणारे ते महत्वाचं आहे.

(उमेश प्रचंड खूश होऊन पेन खिशाला लावतो आणि निघतो.)

मिलींदः (स्वप्नाकडे आश्चर्याने पहात) तू कशी काय परत? (थांबून) का तुला परत पाठवलं त्यांनी? एकदा परत बोलून बघ म्हणून?

स्वप्नाः (रागाने) तू काय बोलतोयस मिलींद? (डेस्कवरची किल्ली घेते. त्याला दाखवते.) विसरले होते. घरापर्यंत जाऊन परत आलेय.

मिलींदः सॉरी.

स्वप्नाः काये ना, आपल्याला पटवून दिल्याशिवाय एखादी गोष्ट खरी आहे असं वाटतंच नाही ना!

मिलींदः सॉरी म्हणालो ना!

स्वप्नाः उपकार करतोयस का? जाऊ दे. मी काहीही सांगितलं तरी खोटंच वाटणारे तुला.

मिलींदः रिक्षा थांबवली नाहीस का तू? रिक्षानीच आलीस ना?

स्वप्नाः मला वाटलंच तुला असं वाटणार. मी रिक्षातनं उतरले आणि त्याला स्टेशनचं भाडं मिळालं, तो म्हणला मी...

मिलींदः जाऊ दे अगं, कोणी काय तुला फासावर देणार नाहीये, इथं दहा मिनिटं थांबलीस तर.

स्वप्नाः तो मुलगा कोण होता?

मिलींदः उमेश भोसले, माझ्यासारखी बातमीदारी करायचीये त्याला.

स्वप्नाः आणि ती कसलीतरी कच्च्या मालाची कागदपत्र?

मिलींदः ऑफीशीयल आहे. उदया बघ ना पेपरात.

स्वप्नाः दिलीयस तू बातमी? मिलींद तू बातमी नॉर्मल देणार होतास आणि आता मी इन्व्हॉल्व्ह आहे म्हणून पेटून जास्त देत नाहीयेस ना?

मिलींदः तू मला सांगायच्या आधी मी सांगीतलं होतं. पहिल्या पानावर, राईट कॉर्नर. डबल कॉलम फोटोग्राफ.

स्वप्नाः मिलींद काहीच नाही ना होऊ शकत?

मिलींदः नाही.

स्वप्नाः ठीके. मी फक्त एक फोन करु का?

मिलींदः मी कोणाशीही बोलणार नाही.

स्वप्नाः तुला नाही त्रास देणार. मला फक्त सरांना सांगायचंय की हे होत नाहीये. (थांबते.) करु फोन? (तो मानेनेच हो म्हणतो. आणखी काही वेळ जातो.) करु ना?

मिलींदः पन्नास पैसे ठेव हवं तर.

(स्वप्ना त्याच्याकडे पूर्णपणे आशाळभूतासारखी पहातेय. मिलिंद मान इकडे तिकडे वळवून उभा आहे. ती शांतपणे पावलं टाकत फोन पाशी जाते. मिलिंदच्या चेहऱ्यावरचा ताण आणखी वाढत जातो. ती रिसीव्हर उचलते. फोन लावते. एकदा मिलींद कडे पहाते. केस नीट करते.)

स्वप्नाः हां संकलेचा सर? स्वप्ना. हिंदुस्थानच्या ऑफीसमध्येच आहे. हो. सर हे नाही होते. म्हणजे ते चेंज नाही करणार. इथं रात्रपाळीचे उपसंपादक आहेत. नाही ते शिमल्याला आहेत. पानं जातील आता. अहो मी केला प्रयत्न, आय स्वेअर, अं हो, हं, हं (आवाज कातर होत जातो.) ओ के. (खूप वेळ ऐकतेच आहे. मिलींद तिच्याकडे एकटक पहातोय. ती फोन ठेवून देते.)

स्वप्नाः (आवराआवरी करत, तडकाफडकी) चला मी निघते.

मिलिंदः काय गं एकदम!

स्वप्नाः झालं. उदयापासनं येऊ नको म्हणाले.

मिलींदः असं म्हणाले ते? (स्वप्ना प्रचंड रागाने त्याच्याकडे पहाते. सावरत) म्हणजे मला नाही वाटत, एका बातमी वरुन ते तुझी नोकरी काढून घेतील. आत्ता बोलले असतील तसं पण उदया राग होईल शांत.

स्वप्नाः तू आणि आपल्याकडे झाडू काम करणाऱ्या कमलाबाई यांच्यात खरं तर काहीच फरक नाही. फक्त तू बरी रहातेस. सुनिल जोशीची बायको या क्वालिफीकेशन वर कुठे कुठे निभाव लागणार तुझा? असं म्हणाले आत्ता. आता बोल.

मिलींदः आणि तुला यांना वाचवायचंय?

स्वप्नाः (रागाने) मुददा यांना वाचवायचा नाहीचे. मुददा मला स्वतःला वाचवायचा आहे. माझं काम, उदयाचं जेवण, आठवडयाचं सामान, या महिन्याचं वीज बिल, हे सगळं वाचवायचं. एकतर नवीन काम शोधायचं नाहीतर उदया जाऊन पाया पडायचं.

मिलींदः एवढी लाचारी करायची काही गरज नाही त्यांच्यासमोर. तुला मिळेल नोकरी.

स्वप्नाः कुठल्या जगात आहेस रे तू? जगात सगळी माणसं आपल्याला हवी तशी असती तर अजून काय होतं? आधीच इथे ओळखीने लागलेय म्हणून लोकांना प्रॉब्लेम होताच. आता परत नोकरी शोधा.(डोक्याला हात लावते.)

मिलींदः माझ्या ओळखीच्यात कुठे बघू का?

स्वप्नाः (हसत) अरे आहे ती वाचवायला मदत करत नाहीयेस, नवीन कुठनं देणारेस? आणि आता पेपरा बिपरात रिपोर्टींग करायची माझी तयारी नाहीये. बाहेर काय भयंकर परिस्थीती आहे, हजारो क्वालिफाईड बेकार पडलेले आहेत. मुंबईत तर इंटरव्यूचा वर्ल्ड रेकॉर्ड केलाय मी. एकवीस इंटरव्यू दिलेत. एकवीस. तुला काय त्याची झळ कळणार म्हणा, इथं पुण्यात गुबगुबीत ऑफीसमध्ये बसून बातम्या छापतोयस. एकावर एक. आहे ती नोकरी इमानेतबारे धरुन चालू आहेस. सगळयांना असं नाही मिळत.

मिलींदः कसं आहे ना, सोडायची होती मला नोकरी, पण मी आणि जिनं नोकरी एकत्र सोडून जायचं आणि खूप काय काय करायचं ठरवलं ना, ती आम्हाला दोघांनाही लाथ मारुन गेली. कसं वाटतं हे ऐकायला?

स्वप्नाः (चिडून) झाली आता आठ दहा वर्ष, बाहेर पड त्यातनं.

मिलींदः हे ढकलेल्या माणसानं बुडणाऱ्या माणसाला सांगणं सोप्प आहे. बाहेर पड त्यातनं. आणि कसं आहे, प्रत्येकाला वाटतं, आपल्यापेक्षा समोरच्या माणसाचा संघर्ष कमी आहे, त्याच्या आयुष्यात किती आराम आहे, त्याला तर सगळं आयतंच मिळतं, पण तसं नसतं. आणि कुणी सांगितलं मी इमानेतबारे नोकरीच केली दहा वर्षे? पेट्रोलपंपावरही काम केलं होतं मी तू सोडून गेल्यावर. जून ऐक्यांशी ते सप्टेंबर ब्याऐंशी काढून टाकलं होतं ऑफीसने.

स्वप्नाः म्हणजे तुझं म्हणण आहे माझ्यामुळे तुला ऑफीसमधनं काढलं?

मिलींदः अर्थात! तू गेल्यापासनं मी अक्षरशः अधांतरी झालो होतो. मुलींनी फाटा दयायच्या किश्श्यांमधलं आणखी एक नाव झालो होतो. लोक लांबून सांगायचे. अरे हा बघ, हयाचं आणि त्या मुलीचं होतं. मग ती गेली पळून. तुझ्याबददल ती बातमी वाचताना अक्षरशः पाण्याच्या धारांनी ओला झाला होता कागद. प्रिंटींग वाला कदम मुददाम माझ्याकडे बघून म्हणाला होता आता अशा गेलेल्या पोरींना सोडतायत होय मुंबईत? वापरली असणार बरोब्बर! पेपरवेट फेकून मारला होता त्याला मी. काढून टाकलं मग. (ऑकवर्ड शांतता जाते.) वाटतं माझ्याकडे बघून? दीड वर्ष मी वेडयासारखा वणवण भटकलो असेन? बीअरबार मध्ये फेस न आणता बीअर भरली असेन, मग पेट्रोलपंप, दहावीचे पेपर तपासणे, पोस्टात पत्रं लिहून देणे, सायकल दुरुस्ती, रसाचं गुऱ्हाळ, दारु, सिगरेट, गर्द काय नाही केलं विचार, सगळं सोड मी मुंबईलाही आलो होतो दोन दिवस.

स्वप्नाः (धक्यात) काय?

मिलींदः म्हणलं विचारु हिला, बाई काय चुकलंय एवढं आपलं? आत्याकडे राहीलो आणि परत आलो पुण्याला वेडयासारखा. मग एक दिवस पंढरपुरे साहेबांचा फोन आला ऑफीसमधनं, नीट वागणुकीच्या लेखी हमीवर परत घेऊ. मला हसू आलं, कारण मला माहीती होतं अण्णांनीच केला होता त्यांना फोन. मला नव्हतं जायचं, पण गेलो. धरली नोकरी. परत सुरु केलं आयुष्य! किती गोष्टी विस्कटल्यास कल्पना आहे तुला?

स्वप्नाः मी काय करु? त्यावेळी माझ्या हातात काही नव्हतं.

मिलींदः फार टिपीकल वाक्य आहे हे.

स्वप्नाः दुसऱ्याच्या भावनांवर असे रपकन शेरे मारुन काय होतं रे? म्हणजे तुला माझं काही ऐकूनच घ्यायचं नाहीये.

मिलींदः आत्ता ऐकून फक्त वेळ जाईल! बाकी काही होणार नाही.

स्वप्नाः आणि माझ्या मनावर जे ओझं आहे त्याचं काय? का तुला मला मरेपर्यंत त्या ओझ्याखाली ठेवायचंय? (थांबून) सगळं गेलंय माझं या ऑफीसमध्ये किमान एक मित्र तरी परत मिळू दे मला! त्याला कळू दे की मी आनंदानी, मर्जीनी किंवा फसवून हे सगळं नाही केलेलं.

मिलींदः मग का केलसं? मला न सांगता सवरता तू अशी एकदम निघून गेलीस. चांगलं म्हणलं होतं राज्यस्तरीय अधिवेशन आहे वर्ध्याला, जाऊ आपण. राहू चार दिवस. तू नाही म्हणालीस. तुझ्या मनात काहीतरी भलतच चाललं होतं. भांडण झाल्यावर एवढी फुगलीस की आदल्या दिवशी भेटायलाही आली नाहीस.

स्वप्नाः नाही आले कारण मला राग आला होता तुझा. तुला तुझ्याबरोबर कुणीतरी हवं असायचं सतत. फक्त तुझ्याबरोबर फिरणारी मुलगी व्हायचं नव्हतं मला.

मिलींदः मी असं वागवलं तुला कधी?

स्वप्नाः. अंगावर यायच तुझं अधिकार दाखवणं. तेव्हा तर जास्तच यायला लागलं होतं.

मिलींदः आपण जवळच आलो होतो तेवढे. मला तुझ्याशिवाय दुसरं काही दिसत नव्हतं सुचत नव्हतं.

स्वप्नाः तू असा धरुन ठेवायचास मला.

मिलींदः तू होतीसच तशी.

स्वप्नाः मला कळत नव्हतं आपण कशातनं चाललोय. जेमतेम वर्ष दीड वर्ष झालं होतं प्रेमात पडून, त्यात तू सगळीकडे डिक्लीअर करुन मोकळा झाला होतास. दडपण यायचं मला तुझ्या डिक्लीअर करण्याचं.

मिलींदः मला नाही यायचं, कारण माझ्याकडनं सगळं पक्क होतं ना. तू नाही येणार म्हणल्यावर गेलो मी, आणि परत आलो तर जे कळालं त्यानी हादरलो अक्षरशः! पळून गेलात तू आणि धनू? मुंबईला?

स्वप्नाः धनु गेली होती, मी नाही.

मिलींदः तिच्यावर खापर फोडू नको.

स्वप्नाः धनु कशी होती तुला माहीतेय, कुठल्यातरी मासिकात मुंबईला पळून आलेल्या नटयांबददल वाचलं आणि ठरवलं. कुठनंतरी अविनाश नावाचा एक माणूस गाठला. त्यानं मुंबईला अमुक अमुक स्टुडिओत ये सिनेमात काम देतो असं सांगितलं. जायच्या आदल्या दिवशी मला म्हणाली मुंबईला महत्वाचं काम आहे, कोणाला सांगू नको. मी म्हणलं आता बरोब्बर जिरेल हिची, स्टेशनवर उतरल्या उतरल्या म्हणेल नको बाई चल जाऊ पुण्याला. मैत्रीणी मैत्रिणी महाबळेश्वरला चाललोय असं सांगून निघालो. पोचलो दुपारी मुंबईत. स्टेशनला उतरलो आणि आ वासून उभं असलेलं शहर दिसलं. तिथला वास, उकाडा, गर्दी आणि चहूबाजूनी अंगावर येणारी माणसं पाहून मला वाटलं ही म्हणेल परत जाऊ तर ती उलट होती. उडयाच मारायला लागली. मला म्हणाली ऐ वेडे, घाबरु नको. बंबईमे सब अच्छा होता है, ऐसा मॅगझिन मे निकी भाटिया नटी ने लिखा है. हात सोडला आणि निघाली पुढे.

तिची काळजी म्हणून मी तिच्या सोबत गेले. हीनं आगाऊपणे टॅक्सी केली, त्यानी फिरवलं, आणि सत्तर रुपये लावले. जवळपासचे पैसे संपले. मग एका स्टुडिओत गेलो, मी तिला म्हणत होते चल चल. पण ही ऐकेचना. तिथं आत जाऊन तरन्नुम नावाच्या साईड नटीला भेटलो. धनु नी तिला तिथंही सीता और गीता मधला हेमा मालिनीचा डायलॉग म्हणून दाखवला. तीन फारसा रस दाखवला नाही तर ही म्हणाली, तीला कॉम्पीटीशन होणार ना माझी? ती कशाला चांगली म्हणेल! अविनाश नावाचा कोणीही माणूस तिथल्या आणि आसपासच्या कुठल्याच स्टुडिओत काम करत नाही,हे कळेपर्यंत चांगलाच उशीर झाला होता.

तेवढयात एका बाईनी आम्हाला पाहील. ती तिथं काम करायची. ती म्हणाली बहोत लेट हो गया, अंधेरे मे बाहर मत घूमना, बेटी जैसी हो, चलो. रात्री घरी नेलं. थांबून जेवायला घातलं. तिचा मुलगा पण होता घरात. तो धनूकडे बघून म्हणाला उदया प्रोडयूसरला भेटवतो. हिला काम मिळेल. धनू नाचायलाच लागली. मी ठरवलं सकाळी उठायचं आणि पहिला शेजाऱ्यांकडे फोन करायचा. रात्री झोपताना माझ्या चेहऱ्यावर फुंकर मारुन म्हणाली येडे, कलसे अपना नसीब बदलने वाला है! मी मान वळवून झोपले. दुसऱ्या क्षणी सकाळ व्हावी अशी इच्छा धरुन. पण तीच रात्र आयुष्यातली सगळयात लांब रात्र निघाली.

मधनंच एक गार हात दंडावर जाणवला. मी दचकून पाहीलं तर त्या बाईचा मुलगा शेजारी धनूच्या अंगावर होता. त्यानं एका हातानं तिचं तोंड दाबलं होतं. तिच्या कमरेभोवती पाय टाकून त्याची पकड केली होती आणि ती सुटायला अक्षरशः झटके देत होती. एका हातानं तो वाटटेल ते करत होता. काही कळायच्या आत मी उठले आणि मानेभोवती हात टाकून त्याला खेचलं, तसा त्याचा हातात असलेला धनूचा ड्रेस टरकन फाटला. धनू धडपडत उठली. आरडाओरडयानं ती बाईही उठली. त्या दोघांनीही मला आणि धनूला कोपऱ्यात ढकललं आणि दिसेल तिथे लाथा बुक्यांनी मारायला सुरुवात केली.

मी कसा बसा खुंटीवरचा कंदील काढला, स्वतःची ओढणी पेटवली आणि म्हणलं एक पाऊल पुढं टाकलंत तर आग लावीन सगळयाला. कसेबसे बाहेर पडलो. धनुकडे पाहीलं, तिला स्वतःची लाज कशी लपवायची कळतही नव्हतं. हातात कंदील घेऊन रात्री दोन अडीच वाजता आम्ही दोघी बहीणी वेडयासारख्या जीव वाचवून पळत होतो. रस्ता माहीत नाही, वस्ती माहीत नाही, अंगावर धड कपडे नाहीत! (बोलत बोलत त्याच्या

जवळ जाते.) मग पोलिस दिसले, (खचून) त्यांना आधी वाटलं वेश्या आहोत. मग सगळं घरचं वगैरे सांगितलं. त्यांनी स्टेशनला नेलं, पैसे दिले आणि सकाळी गाडीत बसवलं. त्यातल्याच एकानं बातमीदाराला सांगीतलं असणार, दुसऱ्या दिवशी घरी आलो तोवर गहजब माजला होता. मार मार मारलं आम्हाला. खायला नाही, अंघोळ नाही. तिसऱ्या दिवशी पेपरात बातम्या आल्या. पुण्याच्या मुली, मुंबईला सापडल्या, अत्याचार झाल्याचा संशय. सिनेमाचं वेड की आणखी काही? दोघींचे फोटो. पुढच्या दिवशी सकाळी जाग आली, तेव्हा कळलं, धनु गेली होती. धनु गेली होती मिलींद !! (त्याला बिलगते आणि रडायला लागते. त्याला कसं सावराव कळत नाही. तो हबकतो. खालंन एक दोन दुकांनांची शटर्स बंद झाल्याचा आवाज येतो.)

तुला आठवतंय थंडीत गच्चीवर एका पांघरुणात बसायचो आपण, तेव्हा मी तुला म्हणायचे, धनु किती सुंदर आहे रे. नीट नेटकी, देखणी आहे. कधी वाटलं नाही पण त्या दिवशी पहिल्यांदा मला वाटलं की खरंच मी तिच्या पेक्षा सुंदर असायला हवे होते. बाकी काही नाही, किमान ती वाचली तरी असती रे.

मिलींदः खडकवासल्यात उडी मारली तिनं. ऐकलं होतं मी.

स्वप्नाः पोहता येणाऱ्या माणसानी पाण्यात उडी मारुन जीव दिल्याचं ऐकलंयस कधी? (रडू आवरते.) आणि काय करणार ती तरी? जीण हराम केलं होत तिच दोन दिवस. (शांतपणे खुर्चीवर बसते.) अजूनही आठवतंय. माझा ड्रेस होता तिच्या अंगावर तिला आणलं तेव्हा, अशी फुगली होती. तिला पाहीलं आणि अक्षरशः चुरा झाला माझा आतल्या आत. मरण नावाच्या कुठल्यातरी गोष्टीची जाणीव एकदम आतपर्यंत गेली. मणका गारठला इतपर्यंत. कदाचित ज्या वेगानं धनू त्या धरणाच्या पाण्यात पडली असेल, त्याचा दुप्पट वेगानं मी त्या मरण नावाच्या भावनेत पडले. अगदी तळाला गेले. पुढचे कित्येक दिवस धनु दिसायची मला. झोपाळयाच्या लोखंडी गजाला धरुन पाय मुडपून बसलेली. हेमा मालीनीचे डायलॉग म्हणत वाडयात सायकल लावणारी, खळग्यातल्या पाण्यात मुददाम अंगठा बुडवणारी. रेडीयोजवळ घुटमळत मुददाम गोल बटणाशी खेळून खरखर आणणारी. आरशात न पहाता झपाझप वेणी घालणारी. तिची जाणीव झाली की अक्षरशः नाकातोंडात पाणी गेल्यासारखं व्हायचं. चोवीस तास एवढंच वाटायचं की आपण जर तिला थांबवलं असतं तर यातलं काहीही झालं नसतं. वाटायचं स्वतःला संपवून घ्यावं. मग एकदा मीही सगळी ताकद एकवटली आणि गेले

मिलींदः (आश्चर्याने) कुठे?

स्वप्नाः खडकवासल्याला. पिशवीत तिच्या सगळया वस्तू घेऊन. कोपऱ्यावर उभी राहीले आणि रोज सकाळी सकाळी जशा वस्तू फेकायचो एकमेकींच्या अंगावर रागावून तशा तिच्या क्लिपा, पिना, शाईपेन, घडयाळ, अगदी जाई काजळाची डबी पण, सगळं टाकलं तिच्या अंगावर. म्हणलं धर बाई. धर. हे पण तुझं. ते पण तुझं. बास. खुश. पिशवी उपडी करुन उडी मारायची होती पण धीरच झाला नाही माझा. रडून रडून दमले आणि शांत बसले, काही वेळ गेला असेल नसेल, डोळे मिटले तशी गार वाऱ्याची एक झुळूक जाणवली चेहऱ्यावर, मी झोपले असताना धनु फुंकर मारायची माझ्या चेहऱ्यावर अगदी तशीच. वारा नव्हता तो. धनुच होती. कानात अस्पष्टसं ऐकूआलं ‘सोन्या बेटा घर जाओ, माझी काळजी करु नको.’ किती वेळ बसले माहीत नाही. कधीतरी घरी आले, पण त्या दिवसानंतर कधीच दिसली नाही मला, जाणवली ही नाही. धनू जायच्या आधी मी वेगळी होते, गेल्यानंतर वेगळी झाले. पूर्ण शांत, अबोल, कशालाही हो नाही काहीही न म्हणणारी. मग कधीतरी

अचानक तू आठवलास. तुला भेटावसं वाटलं कडकडून. निरोपही पाठवला होता मी मधू सोबत. भेटायचंय म्हणून.

मिलींदः मिळाला होता तुझा निरोप. येऊन थांबलोही होतो पुलावर मूर्खासारखा. नंतर कळलं तू निघून गेलीस. (अगतिक होऊन) का गेलीस तू स्वप्ना? आपण केलं असतं काहीतरी.

(फोन वाजायला लागतो. ती त्याकडे पहाते. तो राहू दे म्हणतो. फोन वाजत रहातो. बंद होतो.)

स्वप्नाः मी काय करणार? लगेच उचलून कोकणातल्या घरी ठेवलं प्रकरण शांत होईपर्यंत. मग ओळखीतनं सुनिलचं स्थळ आलं. वडलांनी सगळी परिस्थीती सांगितली आणि तो होच म्हणाला. मला काहीही बोलताच आलं नाही. महिन्याभरात लग्न लागलं. लग्नात मला निरोप देताना बाबा म्हणाले लावलं की नाही लग्न त्या भागवतच्या नाकावर टिच्चून? मी म्हणलं म्हणजे? तर मला म्हणाले तुझं हे झाल्यावर मी अण्णांना जाऊन भेटलो होतो की पोरांचं लग्न लाऊन देऊ, स्वप्ना ला आधाराची गरज आहे, तर अण्णा सगळयांसमोर म्हणाले होते, असली लफडेबाज पोरगी कोण करणार?

मिलींदः मी असं काहीच बोललो नाही. अगं अण्णांनी मला सांगितलंही नाही. (खचून) मला माहीतही नाही हे.

स्वप्नाः वाटलचं होतं मला. (दीर्घ श्वास घेत. सगळं पुसून टाकत) मग काय? सुनील बरोबर सुरु झालं नवीन आयुष्य. खरंतर त्याच्या मागोमाग. अजून तसंच चालू आहे.  आठ  एक वर्ष झालीयेत मिलींद , बडोदा, मुंबई, दिल्ली, भोपाळ, पुणे, फिरतोय आम्ही नुसते. तुला दहा वर्ष एका जागी बसून बसून कंटाळा आलाय, आणि मला फिरुन फिरुन! आता वाटतंय हे फिरणं संपलं पाहीजे. कधी संपणार देव जाणे. आता बघ ना, हा जॉब गेला, पुढचा कधी कुठे कसा मिळेल काय माहीत? त्यात पहिल्यांदा प्रेग्नंट राहीलेय. व्ही आय पीच्या जडजड बॅगा आता कशा उचलून टाकणार मी ट्रेनमध्ये? (सांभाळून) अजून सुनिललाही माहीत नाहीये.
परवा झालंय कन्फर्म. आला की सांगेन.

मिलींदः (अचानक) अगं? तू आधी का नाही बोललीस? हे प्रेग्नंट असण्याचं.

स्वप्नाः काय फरक पडला असता त्यानी? सोड. (अचानक) मिलींद काही खायला आहे का रे?

मिलींदः (अचानक त्याचा पवित्रा बदलतो.) अगं, आता बंद झालं असेल गं सगळं! मघाशी का नाही खाल्लसं?

स्वप्नाः लक्षात नाही आलं माझ्या.

मिलींदः (थांबून) डबा आहे माझा. खाशील का?

स्वप्नाः तुला?

मिलींदः खा तू.

(मिलींद तिला डबा देतो. ती शेजारनं पेपर घेऊन त्यावर तो ठेवते, आणि डबा उघडून खायला सुरुवात करते. खाण्याच्या स्पीड वरुन भुकेली आहे हे कळावं. मिलींद तिच्याकडे एकटक पहातोय. स्वप्ना खाताखाता थांबून त्याच्याकडे पहाते.)

स्वप्नाः पहिले तीन महिने जरा काळजी घ्यायला सांगीतलेय. खायच्या प्यायच्या वेळा वगैरे. पण इथं आम्ही दोघंच, त्यात तोही आता बाहेर. आणि लग्नानंतर माहेरी जायची इच्छाच राहीली नाही.

मिलींदः (थांबून) काँग्रॅच्युलेशन्स पण. अ गुड न्यूज इज अ गुड न्यूज. (थांबून) तुला सांगू तीन चारच क्षण असतील हां या दहा वर्षातले लक्षात राहीलेले, त्यातला एक स्वाती नी ऑफीसमध्ये फोन करुन सांगितलेला. मी असा आत बसलो होतो. त्या दिवशी कामाची प्रचंड गडबड होती, ती म्हणाली मी प्रेग्नंट आहे मी ओके नंतर बघू असं म्हणून फोन ठेऊन दिला होता. दोन मिनिटानी लक्षात आलं माझ्या. धावत सुटलो होतो ऑफीसमधून.

(फोन वाजतो. मिलींद जाऊन फोन घेतो.)

मिलींदः भागवत दैनिक हिंदुस्थान. हां, हां साहेब बोला. नाही ते शिमल्याला आहेत. हो, झालंच आहे, पहिलं पान लावतोय आता. नाही ती... आहे ना. अहो, साहेब. लोकं तोंडात शेण घालतील आपण बातमीत नाव छापलं नाही तर! (स्वप्ना तशीच उठायला जाते. तो बसवतो.) तुमची ओळख वगैरे सगळं बरोबर आहे पण चूक आहे ना. नाही नाही मी तुम्हाला शिकवायचा प्रश्नच येत नाही. अहो साहेब...(फोन ठेऊन देतो.)

स्वप्नाः कोण होतं?

मिलींदः पंढरपुरे, पेपरचे ट्रस्टी. खासदार पाटील आहेत ना सांस्कृतिक केंद्राच्या कमिटीवर ते यांचे गायछाप मित्र. (थांबतो) मला म्हणाले, संकलेचांच नाव काढून मला बातमी वाचून दाखवा. नाहीतर बघतो तुमच्याकडे. (एक सुस्कारा सोडतो.)

स्वप्नाः मग आता?

मिलींदः आता काही नाही. नावासकट बातमी आली तर सोमवारी मिटींग होणार. सगळे येणार. मला घालूनपाडून बोलणार. आणि मला अशा माणसांसमोर माफी मागायला लागणार ज्यांना बायलाईन आणि हेडलाईन मधला फरकही कळत नाही.

(पुन्हा एकदा फोन वाजतो. मिलींद आणि स्वप्ना एकमेकांकडे चमकून पहातात. मिलींद फोनकडे जातो.)

स्वप्नाः आता?

मिलींदः हे केलं तर आयुष्यात स्वतःकडे कधीच नीट बघता येणार नाही आणि नाही केलं तर हे मला काय सुखानं जगू देणार नाहीत. काय करायचं आता?

(आत जाऊन फोन उचलतो. अंधार.)

**प्रवेश तिसरा**

(मिलींद जिन्यावर उभा आहे. स्वप्ना टेबलवर कोपरे ठेऊन डोक्यावरुन हात फिरवतेय.)

स्वप्नाः काय ठरवलंयस?

मिलींदः बघू. पाटील साहेब म्हणाले दात आले का. पण मला काही टेंशन बिंशन आलेलं नाहीये. डोन्ट वरी. थँक्स टू युअर सर. तू फोन केल्यानंतर झालय हे सगळं.

स्वप्नाः म्हणजे हे ही माझ्यामुळे?

मिलींदः होणारच होतं. आपल्याकडे काम कधीच समोरन करायची पध्दत नाहीये, खालनं मी मॅनेज झालो नाही म्हणून वर गेलंय हे प्रकरण.

स्वप्नाः तू बातमी छापणार हे कळल्यानंतर खरंतर एकाच गोष्टीचं बरं वाटलं होतं मला उदयापासनं त्या आमोदला भेटायला लागणार नाही.

मिलींदः आमोद?

स्वप्नाः सरांचा भाऊ आहे. आमचा चीफ कन्स्ट्रक्शन ऑफीसर. त्याची आणि माझी एक गम्मत आहे.

मिलींदः काय दोघं मिळून शिवणापाणी खेळता का ऑफीसमध्ये?

स्वप्नाः (शांतपणे पाहून बसते.) हो खरंतर, तो मला सतत शिवायचा प्रयत्न करतो.

(मिलींद चमकून तिच्याकडे पहातो.)

सरांना सांगतो हिच्यात काही दम नाही. तसं बघायला गेलं तर गेला एक महिना मीच सगळी कामं करतेय. आर्टीकल्स लिहीते, सरांच्या नोटस काढते, क्लायंटस ना प्रेझेंटेशन्स देते अडी अडचणीला स्टॉलवर पण उभी रहाते.

मिलींदः आपल्याला एकापेक्षा जास्त काम करता येत हे समोरच्याला कळलं त्याचा तोटाच होतो, फायदा नाही. हाफ पेज आर्टीकल लिहीणारा मी. एकदिवस बसवलं पंढरपुरे साहेबांनी शब्दकोडं लिहायला.

स्वप्नाः का लिहीलंस?

मिलींदः अक्षर चं ऑपरेशन होतं. ऑफीसनं सहा हजाराची मदत केली होती.

स्वप्नाः काय झालं त्याला?

मिलींदः मावशीकडे गेला होता. रस्त्यावर खेळताना गाडी आली अंगावर. त्याचा पाय आला चाकाखाली.

स्वप्नाः अरे देवा. फार सिरीयस नाही ना?

मिलींदः एक रॉड आणि सहा स्क्रूआहेत पायात. तरी अजून टेकवताना जरा त्रास होतो.

स्वप्नाः भर चौकात उघडा करुन फटकवला पाहीजे, ज्यांच्यामुळे हे झालंय.

मिलींदः (खिन्नपणे हसतो.) माझ्या मुलाला हे झालं म्हणून चिडलीस तू, करणारे कोण आहेत हे माहीत नसतानाही त्यांना चाबकानं फटकवायला निघालीस तू, आणि दुसरीकडे जिथे सत्तर फूटाची भिंतं पडलीये जिवंत माणसांवर, आणि ते कुणी केलंय हे ही तुला मला माहीतेय मग का नाही त्यांची नावं यावीत?

स्वप्नाः आमोदनीच केलेली चूक आहे ही . रॉ मटेरिअल, परचेस, कॉन्ट्रॅक्टर्स सगळी त्याची जबाबदारी होती. सरांना यातलं काय काय माहीत पण नसेल. पण काय करणार सुनील चा जुना मित्र आहे. म्हणूनच हा जॉब मिळालाय. (थांबून) त्याला माहीतेय सुनिलचं सगळं मग कधीतरी सकाळी लवकर, दुपारी कुणी नसताना, संध्याकाळी उशीरा बरोब्बर मला भेटतो तो किंवा गाठतो. मग मित्र असल्यासारखं बोलतो, काहीही मदत लागली तर सांग म्हणतो. बोटांनी केस बाजूला करुन, स्ट्रेस नको घेऊस म्हणतो, शेकहॅंड केलं की मी ऑकवर्ड होईपर्यंत हात सोडत नाही. दिवसा हे सगळं आणि रात्री भेटला की...

मिलींदः (एकदम काकुळतीला येऊन) रात्री?

स्वप्नाः पार्टी असते ना त्यांची. आठवडयातनं एकदा.

मिलींदः ओ बरं बरं!

स्वप्नाः सुनील दारु पीत नाही, येतो फक्त. आमोद दारु पितो, आणि माझं इतकं कौतुक करतो, इतकं कौतुक करतो की हळूहळू सुनिल चा चेहरा घाबराघुबरा होताना दिसतो. काही बोलत नाही पण घरी गेल्यावर काळजीनं एवढंच विचारतो, तुला फार त्रास नाही ना होत? आपली बायको घर चालवायला काहीतरी भलतसलतं करत नाही ना याची धाकधूक सतत दिसते त्याच्या चेहऱ्यावर.

मिलींदः का सहन करतेयस तू हे?

स्वप्नाः कारण माणूस चांगला आहे अरे. आता परिस्थीती साथ देत नाही त्याला तो काय करणार? कर्मशिअल आर्टीस्ट आहे, एक काळ खरंच मोठया मोठया एजन्सीज मध्ये काम केलयं, मग वाटलं स्वतःची एजन्सी सुरु करु. पण कला आणि व्यवहार या दोन वेगळया गोष्टी आहेत. नाही चालली एजन्सी. कर्ज झालं. गेले तीन साडे तीन वर्ष काही करत नाही. स्वतःवरचा विश्वास इतका गेलाय ना सतत त्याचा आधार व्हावं लागतं मला. मला केलं होत ना त्यानं आहे तशी ॲक्सेप्ट मग मी का नाही त्याची साथ दयायची. म्हणून मरतेय रे. आणि त्यात हा आमोद. तुला माहीतेय दर सोमवारी सकाळी ऑफीसला गेले की मी त्याला काय म्हणते? बाबा, काहीही कर माझं कौतुक नको करुस. तो हसतो मग असा छान. त्यात आता आजचं झालयं. म्हणजे तो वाटच बघत असणार.

मिलींदः का?

स्वप्नाः त्याला दिसतंय ना की उदया जाऊन मी त्याच्या पायात पडणार. गयावया करणार. मग तो मला खांदयाला धरुन उठवणार. समजावून सांगितल्यासारखं करणार. मी सरांशी बोलतो म्हणणार.
(दीर्घ श्वास घेत) मला त्या वेळेची भिती वाटतेय मिलींद, खरंच! (मिलींद धक्यात उभा आहे.) मी प्रेग्नंट झाल्यापासून मला नेहमी वाटतं मला स्मिता पाटील सारखं जगता आलं नाही, किमान मरता तरी यावं. बघू, किमान तेव्हातरी सुटेन या सगळयातनं!

(मिलींद अडवायला जातो. ती बाहेर वॉशरुमच्या दिशेनी जाते. मिलींद तिच्याकडे पहात रहातो. नकारार्थी मान डोलावतो.)

मिलींदः (फोनपाशी जातो. फोन लावतो.) हां कंपोझिटींगला ती सांस्कृतिक केंद्राची बातमी दिलीय ना? लावली का ती पान एकवर? हं. किती वेळ आहे अजून पान जायला? हं. सांगतो मी. (फोन ठेवतो. एवढयात स्वप्ना बाहेर येते. मिलींद एकवार तिच्याकडे पहातो.)

मिलींदः स्वप्ना, ही दोन माणसं आयुष्यात कधीही वेगळी होणार नाहीत, असं वाटतं असतानाच नशीब त्यांना वेगळं करतं आणि ते आपापल्या वाटेवरनं जात असताना बरोब्बर समोरासमोर आणून उभं करतं. पण बरं वाटलं इतक्या वर्षांनी आपण असे समोरासमोर आलो.

स्वप्नाः तू काय समारोपाचं भाषण करतोयस का?

मिलींदः नाही नाही मी मनातलं बोलून दाखवलं फक्त. इतके दिवस तुझ्या तीन गोष्टी घेऊन जगत होतो, आज चौथी ही दिलीस तू. ही रात्र!

स्वप्नाः (आवरायला लागते.) पेन घडयाळ आणि?

मिलींदः कॅसेट! आपण मंडईत जाऊन रेकॉर्ड करुन आणलेली. दोन रुपयाला एक गाणं. वीस रुपयात दहा वर्षाचं काम झालं बघ.

(स्वप्ना लगबगीने टेपकडे जाते. त्यातून कॅसेट काढते. त्याचं कव्हर वाचते.)

स्वप्नाः तू अजूनही जपून ठेवलयसं हे?

(गाणं लावते. अभी न जाओ छोडकर च्या मधल्या ओळी लागतात.)

मिलींदः मला सवय आहे. (स्वतःहून तिला शाईपेन काढून देतो.) तू मघाशी गेलीस ना तेव्हा मनापासनं काय वाटलं माहीतेय? तुझं काहीतरी वर विसरलं असाव, आणि ते घ्यायला तू परत यावीस.

(स्वप्ना हसून त्याच्याकडे पहाते. वळते आणि तेवढयात फोन वाजायला लागतो. मिलींद फोन उचलतो. ती जायची थांबते.)

मिलींदः हां, मीच आहे. कोण? अच्छा, नाही नाही काही गरज नाही. ती आहे, हं, हं, नाही नका येऊ, अहो, ऐका माझं, नका येऊ...ओ अहो! (फोन ठेऊन देतो.) आमोद संकलेचा, पंधरा मिनिटात येतो म्हणाला, पाटील साहेबांना घेऊन, तुमच्याशी जरा बोलायचंय.

स्वप्नाः मी म्हणलं नव्हतं तुला. आता माझ्याकडून काम झालं नाही, म्हणल्यावर तो येणार, त्याच्याकडून चुकून जरी काम झालं तर मग उदया... (घाबरते.) मी निघते... मला आपल्या दोघांवरही ही वेळ आलेली पहायची नाहीये.

(दोन क्षण जातात, ती त्याच्याकडे प्रचंड आशेने पहाते. मिलींदला काय करावं सुचत नाही. तो तिच्याकडे पहात रहातो.)

स्वप्नाः मिलींद जायच्या आधी एकदा फक्त नेहमीसारखा हात ठेव डोक्यावर. वर्ध्याला जायच्या आधी ठेवायचा राहीला होता, आणि काय झालं बघं. मिलींद प्लीज. एवढं तर करुच शकशील ना माझ्यासाठी. प्लीज मिलींद. प्लीज. ते यायच्या आत.

(मिलींद तिच्याकडे एकटक पहातोय. अचानक उठतो. तिच्या जवळ येतो.)

मिलींदः स्वप्ना, गेले दोन अडीच तास आपण एकमेकांना ओरबाडतोय नुसते. त्याच्यामागे राग आहे तशी काळजी आहे, प्रेम आहे. ते जात नाही कुठेच, तुला माहीतेय. तू आलीस तेव्हा पूर्णपणे चूक वाटली होतीस. आत्ताही तुझी मागणी चूकच वाटतेय. फक्त माणूस म्हणून तुझ्याबददलचा माझा समज एकावर एक धडका खाऊन धुळीला मिळालाय. घडलेली घटना मोठी आहे का तुझी गरज मोठी हा प्रश्न आहे. नावासकट बातमी छापण किंवा न छापण या दोन गोष्टींमधलं एक काहीतरी मला आता निवडायचंय. आणि हे सगळयात कठीण काम आहे कारण बातमी आली तर विशेष काही फरक पडणार नाही हे मला माहीतेय. तू म्हणलीस तसं आपल्या नकळत जगात हजारो गोष्टी मॅनेज होतात. माणूस म्हणून त्याचा प्रचंड त्रास होतो. स्वतःचीच चीड येते. पण पण प्रत्येक माणसाचा परिस्थीतीशी तडजोड करायचा, कनवर्ट व्हायचा एक क्षण असतो, गरज त्याला त्या क्षणाकडे ढकलत असते आणि जाणिव त्याला लांब नेत असते. त्या एका क्षणाच्या अलिकडे समाधान आणि पलिकडे सुख असतं, आणि तुझं हे सगळं ऐकल्यावर मला वाटतंय मी आत्ता बरोब्बर त्या...

(एवढयात धडाधड टेलिप्रींटर जोरजोरात धडधडतो. दुसरा धडधडतो. तिसरा धडधडतो. मिलींद चमकून त्या दिशेनी पहातो. चालत जातो. पहातो. एकेक कागद हातात घेतो. त्याकडे थक्क होऊन पहात रहातो.)

स्वप्नाः काय झालंय?

मिलींदः एक मिनिट... (त्याकडे पहात, सुस्कारा सोडत) आणखी एक अॅक्सीडेंट झालाय.

स्वप्नाःकाय?

मिलींदः मोठा अॅक्सीडेंट झालाय. विमान कोसळलंय अरबी समुद्रात.

स्वप्नाः (बॅग बाजूला ठेवत) काय सांगतोयस काय?

मिलींदः लंडनला जाणारं विमान अरबी समुद्रात कोसळलंय. आत्ता अर्ध्या तासापूर्वी. एकशे सत्तावन्न लोकं गेलीयेत. कोणीही जिवंत असण्याची शक्यता नाहीये. अनेक वी आय पी गेलेत यात. (थक्क होतो. सगळे कागद काढतो. लगबगीने पुढे येतो. फोन उचलतो) भागवत बोलतोय. पहिलं पान गेलं का? चाललंय? थांबा, थांबवा! स्टॉप प्रेस!  स्टॉप इट! पहिलं पान नव्यानं लागणारे. मोठा ॲक्सीडेंट झालाय. (फोन ठेवतो. हाका मारत) गिरीधर, साळवी कोण आहे? का झोपले सगळे ? गिरीधर (एक माणूस पळत पळत येतो.) ही लिस्ट, यांचे ब्लॉक काढून ठेवायला सांग. (लगबगीने मागे जातो.) गेले ट्रान्सलेशनवाले. स्वप्ना, बस, मला ट्रान्सलेशन करायला मदत कर.

(स्वप्ना लगबगीने बसते. मिलींद खुणा करतो)

मिलींदः इथून हे घे. हा पॅरेग्राफ आणि खालची सगळी माहीती. दहा मिनीटात लिहायचीय हां.

(प्रेस थांबल्याचा आवाज येतो. दोघं झपाझप बसून लिहायला लागतात.)

मिलींदः (स्वतःतच) तीन कॉलम होणारे ही बातमी. शिवाय सहा वी वी आय पी त्यांचे फोटो. डबल साईज हेडलाईन.

स्वप्नाः (आशाळभूतपणे) हो?

मिलींदः (सराईतपणे) हो. पहिल्या पानाचं चित्र बदलणारे आख्खं. आणि मृतांची संख्या लक्षात घेता या ॲक्सीडेंटपुढे तुमचा सांस्कृतिक केंद्राचा ॲक्सीडेंट काहीच नाही. (थांबून सावरत) माझ्या माहीतीप्रमाणे आजवरचा देशातला सगळयात मोठा ॲक्सीडेंट आहे हा.

स्वप्नाः हो रे. आणि मला वाटतंय फक्त ॲक्सीडेंट नाहीये हा. घातपातही असू शकतो. आणि सदतीस बायका आणि सात मुलं गेलीयेत.

मिलींदः डुंगरपूर, खोसला, कोतवाल, देसाई, मेहता, अय्यर सगळेच्या सगळे व्ही व्ही आय पी आहेत. या सगळयांचा एक एक फोटो टाकायचा म्हणजे... (सुस्कारा सोडतो.) कुठपर्यंत आलीस?

स्वप्नाः झालं होतचं आलंय.

(झपाझप लिहीतेय. मिलींद सांस्कृतिक केंद्राची बातमी बघतो. त्याच्यावर दोन तीन ठिकाणी काट मारतो. नव्याने लिहायला लागतो. दोन क्षण जातात.)

स्वप्नाः ऐक, एअर इंडीयाचे जंबो जेट कोसळले. सर्व १५७ प्रवासी मृत्युमूखी.

मिलींदः आण इकडे ऐकायला वेळ नाहीये. (झपाझप त्या मजकूरावरुन नजर फिरवतो.)

स्वप्नाः मिलींद, त्या बातमीत काय काय राहीलंय रे?

मिलींदः काही नाही राहीलं आता त्या बातमीत. एकच फोटो. खाली डबल कॉलम बातमी. थोडक्यातच देता येणारे म्हणल्यावर, बांधकाम कोण करत होतं, काय हलगर्जीपणा झाला होता, हे सगळं नाही छापता येणार.

स्वप्नाः त्या मुलीचा फोटो तरी?

मिलींदः जागाच नाहीये तिला पहिल्या पानावर. किंवा कुठल्याच पानावर. आलो मी दोन्ही बातम्या देऊन.

(दोन्ही बातम्या उचलतो. आणि निघून जातो. स्वप्ना तशीच बसून आहे. तिच्या डोक्यावरुन खूप मोठं ओझं उतरलंय. ती टू इन वन समोरचं कॅसेटचं कवर पहाते. कॅसेट उघडते. त्याकडे पहाते. खिन्नपणे हसते. मिलींद येतो.)

स्वप्नाः तू मघाशी काहीतरी म्हणत होतास. कनवर्ट व्हायचा क्षण वगैरे.

मिलींदः नाही, म्हणणार होतो तेवढयात हे विमान पडलं. (थांबून स्वतःशीच डोळयात पाणी आणून) थँक गॉड, मुंबईत अॅक्सीडेंट झाला ना!

स्वप्नाः काय म्हणालास?

मिलींदः एका माणसाची तत्व आणि एका बाईची नोकरी टिकवण्यासाठी एकशे सत्तावन्न जणांनी जीव दयायची ही बहुतेक जगातली एकमेव घटना असेल.

स्वप्नाः मी, मी ही लोकं यायच्या आत सरांना एक फोन करु का फक्त? त्यांना सांगते, कदाचित काहीतरी होऊ शकेल.

मिलींदः हं.

(स्वप्ना फोन पाशी जाते. मिलींद तिच्याकडे पहात रहातो.)

स्वप्नाः (फोन लावते.) हॅलो, हां संकलेचा सर, सर मी स्वप्ना. उदया बातमीत आपलं नाव नाही येणार. नाही नाही अहो थँक यू काय त्यात. नाही नाही पैसे कसले? माझा खूप जुना मित्र आहे. (हसते) हां. मिलींद भागवत. पत्रकार संघाचा पुरस्कार मिळालेला माणूस आहे सर. सांगते.(फोन ठेवते. एकदम बदलून ) खूश झाले सर. मला म्हणाले त्यांना थँक यू सांग, तुम्ही खूप मोठं काम केलंस, आणि उदया आमोदला समोर घेऊन बसू म्हणाले. (जवळ जात) मिलींद, कसे आभार मानू तुझे मी?

(मिलींद काहीच बोलत नाही.)

स्वप्नाः . उदया आहेस तू ऑफीसला?

मिलींदः का उदया काय पाडणार आहात?

स्वप्नाः गप रे. एक नवीन घडयाळाचं मॉडेल बघीतलंय एच एम टी चं. उदया घेऊन येते. तसंही तुला नवीन घडयाळाची नितांत गरज आहे.

(मिलींद स्वतःच्या घडयाळाकडे पहातो. ते बंद पडलंय. त्यावर मारतो. ते सुरु होतं. ती त्याच्या अगदी जवळ उभी आहे. मिलींद तिच्याकडे प्रचंड प्रेमाने पहातो. तिचा हात हातात धरतो, त्याकडे पहातो)

मिलींदः मला नको घडयाळ. तूच आण स्वतःसाठी एखादं, आणि रोज नेमानं घालत जा. किमान डाव्या हातावर नस कापल्याची ही जी खूण आहे ती तरी लपेल! (थांबून) काय मिनू?

(दोघे एकमेकांकडे भरल्या डोळयानी पहातात. ती त्याला कडकडून मिठी मारते. तिची पर्स खाली पडते. रुमाल पडतो. तीचं सगळं आवरलेपण निघून चाललंय. तोही लहान झालाय. दोघे एकमेकांच्या मिठीत आहेत. तो तिच्या डोक्यावर प्रेमानं हात ठेवतो. सगळं उचलतो. तिला आवरुन देतो. ती तयार होते. दोघं एकमेकांकडे पहातात. तो डोळे पुसतो.)

स्वप्नाः (थांबून) मी तुला म्हणलं होतं, असं काहीतरी व्हायला पाहीजे, ज्यानी तुलाही कॉम्प्रमाईज करावं लागणार नाही आणि मलाही मॅनेज करावं लागणार नाही. झालं बघ! (थांबून) येऊ मी?

(जायला लागते. दारापाशी उभी रहाते. मिलीद तिच्या जवळ आहे.)

मिलींदः येस. आपल्या सगळयांना जे करायचं होतं ते झालं. तुझा जॉब वाचला, माझी पत वाचली, कंपनीचं नाव आलं नाही. या सगळयात एकाच गोष्टीच राहून राहून वाईट वाटतंय. डेक्कनच्या पुलाखाली, गारठलेल्या हातांनी, पोटातली भूक आणि डोळयातली झोप विसरुन भोसले एकटा थांबलाय. तो हळहळणार गं उदयाची बातमी वाचून!

(ती निघून जाते. मिलींद तसाच उभा आहे. उमेश बसला होता त्या स्टुलाकडे पहातो. त्यावर जाऊन बसतो. उमेशनं दिलेला पेन खिशातनं काढून त्याकडे पहात रहातो. त्याला हळूहळू रडू येतं. भोसले बसलाय त्या स्टुलावर पाय आणि खांदे आत घेऊन बसलेल्या मिलींदच्या रडण्यावरच छापखान्याचा आवाज सुरु होतो आणि नाटकाचा पडदा पडतो.)

**क्षितिज पटवर्धन**

**२५ मे २०१५, दुपारी १२ वाजून ४३ मिनिटं**